मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
वा. नि.
२८

नि २०२२८
सं. ग्रं. २४३

## मुंबईच्या महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा

# भाषणसमारंभ.

इ० स० १८८६.

## विषय पहिला.

" आपणां हिंदुस्थानच्या लोकांस आपल्या इंग्लिश सरकाराकडून पुष्कळ सार्वजनिक कामें करून घ्यावयाचीं आहेत; तीं करण्याविषयीं सरकारची प्रवृत्ति व्हावी, ह्यास राजनिष्ठापूर्वक कोणकोणते सयुक्तिक उपाय योजावे ? " हा विषय.

आपणां हिंदुस्थानच्या लोकांस आपल्या इंग्लिशसरकारापासून पुष्कळ सार्वजनिक कामें करून घ्यावयाचीं आहेत. हा ह्या विषयाचा उद्देश आहे. सर्व जनांच्या हिताचीं किंवा उपयोगाचीं जीं कामें, त्यांचें नांव सार्वजनिक कामें. अशीं सार्वजनिक कामें शेंकडों आहेत त्यांपैकीं जेवढीं आपल्यास इंग्रज सरकाराकडून करून घ्यावयाचीं आहेत, त्यांचाच आज विचार कर्तव्य आहे. आतां तीं कामें कोणतीं हेंही येथें सांगत बसण्याची गरज नाहीं. लोकांनीं निवडून दिलेले सभासद स्थानिक सरकारच्या व हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत असावे, असें करणें, व्हॉलंटीयर्स लोक राष्ट्रीय सैन्यांत सामील करून लष्करी खात्याचा खर्च न वाढेल असें करणें, इत्यादि पुष्कळ गोष्टी आपणांस सरकाराकडून करून घ्यावयाच्या आहेत, हें अगदीं ठरून गेलें आहे; व कारणपरत्वें ह्या गोष्टी सरकारानें कराव्या अशाविषयीं आपण वर्तमानपत्रद्वारा किंवा अर्जद्वारा सूचनाही करतों; परंतु त्या गोष्टी करण्याविषयीं सरकारची प्रवृत्ति होत नाहीं ह्मणून ती प्रवृत्ति व्हावी अशाविषयीं "राजनिष्ठापूर्वक कोणकोणते सयुक्तिक उपाय योजावे," हा आजच्या विषयाचा मुख्य भाग आहे. प्रवृत्ति होणें ह्मणजे, एखादें काम करण्याविषयीं आपलें मन वळणें, अथवा तें काम आपल्या मनांत भरणें. इंग्लिश सरका-

रच्या मनांत आपलीं सार्वजनिक कामें भरल्याशिवाय तीं तें करणा
नाहीं, ह्मणून तीं त्याचे मनांत भरावीं एवढ्यासाठीं आपणांस उपा
योजावयाचे आहेत, व तेही पण राजनिष्ठापूर्वक उपाय पाहिजेत. आत
राजनिष्ठापूर्वक उपायच कां योजावे, हें सांगितलें ह्मणजे, मीं जे उपा
सांगणार आहें ते आपणांस पुळपुळीत.वाटणार नाहींत. अन्य उपाय मनां
देखील आणूं नये, अशाविषयीं तीन कारणें आहेत. पहिलें कारण असें:--
दिवसानुदिवस सुधारणा होत जाऊन, मानवजातीची रानटी अवस्था ना
हींशी होऊन, तिला उत्तमावस्था प्राप्त होत चालली आहे. अशा स्थि
तींत एका जनसमूहानें आपले योग्य हक्क किंवा स्वातंत्र्य मिळविण्याक
रितां दुसऱ्या जनसमूहांतील हजारों मनुष्यांचे प्राण घेणें, व हजारों बा
यकांमुलांस अनाथ करणें, व त्या दुसऱ्या जनसमूहानेंही येथवर मज
येऊं देणें, ह्यासारखें अमानुषकृत्य दुसरें नाहीं; ह्मणून असले उपा
केवळ रानटी आहेत. दुसरें कारण हें:--आपलें इंग्रजसरकार अत्यं
स्वातंत्र्यप्रिय आहे, त्यानें स्वतः आपलें स्वातंत्र्य महत्प्रयासानें मि
ळविलें आहे, ह्मणून त्यास स्वातंत्र्याची योग्य किंमत कळून आल
आहे. शिवाय आपल्या अमलांतील लोकांस योग्य वेळ आल्यावरह
स्वातंत्र्य देण्याचें नाकारल्यास कसकसे प्रसंग येतात, त्याचाही अनुभव कांह
वेळ त्याला आला आहे. ह्मणून, आपण योग्य झाल्यावरही आप
णांस योग्य रीतीनें न वागवून तसा वाईट प्रसंग तें कधींही येऊं देणा
नाहीं. तिसरें कारण:--आपण हिंदुस्थानचे लोक जात्याच पूर्ण सात्विक
व हाडाचे राजनिष्ठ असे आहों. आजपर्यंत पुष्कळ दिवस आपण पर
कीय अमलाखालीं आहों. मुसलमानांसारख्यांपासून आपणांस पुष्कळ
जुलूम सोसावा लागला, तरी आपण कधींही बंड वगैरे केलें नाहीं.
शिवछत्रपतींसारख्या शूर पुरुषांस तो जुलूम असह्य वाटून त्यांनीं त्याचा
प्रतिकार केला व कांहीं कालपर्यंत स्वराज्य स्थापन केलें, ही गोष्ट जरी
खरी आहे, तरी आमचे इकडे राष्ट्रीय दंगा किंवा लोकांचे राजाभोंवतीं
काहूर, असें कधींच कांहीं झालें नाहीं. आपण इतके सात्विक होण्यास
आपलें सात्विक अन्न कारण असो, किंवा आपला धर्म कारण असो, किंवा
आपली हवा कारण असो, किंवा दुसरें कांहीं असो, आपण पूर्ण सात्विक
आहों, ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच "ना विष्णुः पृथ्वीपतिः" हें तत्त्व आ-



मचे हृदयांत बिंबलें गेलें असो, किंवा कांहीं असो; आपण पूर्ण राजनिष्ठ आहोंत, यांत शंका नाहीं. ह्मणून अशा सात्विक व राजनिष्ठ लोकांनीं आपल्या स्वभावाविरुद्ध असें कांहीं करण्याचें मनांत आणल्यास, तें त्यांस कधींही साधणार नाहीं. व्यर्थ फशीं पडावें लागेल. आपलें राज्य इंग्रजलोकांनीं घेतलें, त्या वेळेस आपलेच लोक नोकरीस ठेवून आपल्याच राजांस त्यांनीं जिंकिलें, ही स्थिति मनांत आणिली ह्मणजे आपली खातरी होईल कीं, आपण लोक तसल्या कामास अपात्र आहोंत. इंग्लंड व अमेरिका इत्यादि देशांनीं स्वातंत्र्यप्राप्तीकरितां कांहींही केलेलें असो, व आयर्लंड आज कोणतेही उपाय योजित असो, आपणांस तिकडे पाहून उपयोग नाहीं. आपणांस तसा कांहीं प्रकार मनांत आणल्यास आज जें आपलें एखादें पाऊल पुढें पडत आहे, तें नाहींसें होऊन आपणांस एकदम पांचपन्नास पावलें मागें सरावें लागेल यास्तव राजनिष्ठापूर्वक असेच कांहीं उपाय योजिल्यास मात्र, हळू हळू कां होईना, पण निश्चयानें आपलें पाऊल पुढेंच पडत जाईल. ह्मणून "राजनिष्ठापूर्वक कोणकोणते सयुक्तिक उपाय योजावे?" हा सभेचा प्रश्न अत्यंत समंजसपणाचा आहे, व त्याचें उत्तर देण्याचा मी यथामति प्रयत्न करितों.

राजनिष्ठापूर्वक उपाय ह्मणजे, आपणांस होत असलेल्या अडचणा सप्रमाणरीतीनें सिद्ध करून मर्यादशील भाषेनें सरकारचे कानावर घालणें, व त्या अडचणी दूर करण्याचे उपाय लीनतापूर्वक सरकारास सुचविणें, व ते करण्याविषयीं मनोभावानें सरकारची करुणा भाकणें, हा होय. इंग्रज सरकारापासून आपणांस कांहीं कामें करून घ्यावयाचीं आहेत, त्यांबद्दल त्याची प्रार्थना करीत असतां, आपण कित्येक गोष्टींचें धोरण राखिलें पाहिजे. आपण जी गोष्ट सरकाराजवळ मागत असूं, ती वाजवी आहे कीं नाहीं, याचा पूर्ण विचार आपण आपले मनाशीं केला पाहिजे. कारण, आपण वाजवी अशाच गोष्टीविषयीं मागणें केल्यास इंग्रज लोकांपैकींही कित्येक उदार लोक आपल्या पक्षास मिळतील, व आपले मागण्यास जोर येईल. दुसरी गोष्ट--आपण जें काम करण्याविषयीं सरकारास विनंती करूं, तें काम हिंदुस्थानच्या पूर्ण हिताचें असून इंग्लंडचें काडी एवढेंही अनहित त्यापासून होतां कामा नये, तरच सरका-

राची तें करण्याविषयीं प्रवृत्ति होईल. तिसरी गोष्ट आपण मागितलेल
हक्कापासून इंग्रजसरकारच्या हिंदुस्थानांतील राज्यसत्तेस तिळभर
धक्का पोंचूं नये. तसें होऊं लागल्यास ते ती गोष्ट कधींही मा
करणार नाहींत. आह्मी आपलें राज्य संभाळण्यास लायक झाले
ह्मणजे इंग्लिश लोक स्वसंतोषानें तें आमच्या हवालीं करून विलायत
निघून जातील, अशाप्रकारचीं मधुर वचनें कितीही दिलेलीं असोत, प
आज मितीस इंग्लंडास हिंदुस्थानांतील राज्यसत्तेपासून अपरिमित फ
यदा आहे, भूषण आहे, व सर्व जगांत मोठा मान आहे; व आपण
मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे कीं, आपणांसही इंग्रजी राज
अजून बहुत काळपर्यंत हवें आहे. चौथी गोष्ट—इंग्रजसरकार शहाण
णांत, कर्तबगारींत, व दूरदर्शित्वांत आपणांहून पुष्कळ पुढें गेलें आहे
ह्मणून त्याचा आपला संबंध वडील धाकुटपणाचा आहे, व आपलें स
प्रकारें रक्षण करण्याचें काम त्यानें पत्करल्यामुळें, आपलें हित अहि
आपणांहून त्यास अधिक समजतें, असें धरून चाललें पाहिजे. ह्मणू
आपणांस सरकारास ज्या सूचना करावयाच्या, त्या, सरकारच्या
आमच्या देशभिन्नत्वामुळें, भाषाभिन्नत्वामुळें, धर्मभिन्नत्वामुळें, व आ
चारभिन्नत्वामुळें, आमची वास्तविक स्थिति व गैरसोय सरकारचे नजरे
यावी तशी आली नसेल ह्मणून ती आह्मी सरकारास कळवीत आहों
तर सरकारानें आमचे ह्मणण्याचा विचार करून आमचें ह्मणणें वाजवी
दिसल्यास ती गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न करावा, अशा अर्थाच्य
सूचना असाव्यात. आपण त्यांस शहाणपण शिकवूं लागल्यास उपयोग
होणार नाहीं. पांचवें धोरण असें राखलें पाहिजे कीं, ज्या अधिकाराविषय
आपण सरकारास मागणी घालणार, तो अधिकार मिळविण्यास
आह्मी पूर्णपणें पात्र आहों, हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें पा
हिजे. उदाहरणार्थ, मुंबईच्या कायदेकौन्सिलांत लोकांनीं निवडलेले
सभासद असावे, अशाविषयीं आपणांस मागणी करणें आहे
तर सरकारास आपण असें कळवावें कीं, आज मितीस कायदे
कौन्सिलांत बसण्यालायक मनुष्यें आमच्यांत बरींच निर्माण
झालीं आहेत. तीं कोण आहेत व त्यांची योग्यता काय आहे, व
त्यांसच निवडून घ्यावें हेंही ज्ञान आह्मांस बरेंच आलें आहे. आज



आह्मांस हा अधिकार दिल्यास आह्मी, ना. मंडलिक, ना. तैलंग, ना. दादाभाई, ना. रानडे, ह्या व अशाच गृहस्थांस निवडून देऊं. ह्यांस आह्मी मोठे विद्वान, निस्पृह, राजकार्यकुशल व लोकहिताविषयीं दक्ष असे समजत आहों. शिवाय, हे गृहस्थ या अधिकारास पात्र आहेत, अशाविषयीं सरकारची खात्री होऊन चुकलीच आहे. ह्याच गृहस्थांस सरकारानें निवडलें आहे, व ह्यांनीं सरकारचे खुर्चीशीं खुर्ची लावून बसून आपलें काम इतक्या उत्तम रीतीनें बजाविलें आहे कीं, सरकारानें वेळोवेळीं त्यांविषयीं संतोष प्रदर्शित केला आहे. ह्मणून आह्मांस हा अधिकार दिल्यास आमचे हातून योग्य अशाच निवडणुका होतील, व सरकारचे हातून कधीं कधीं चुकून असे गृहस्थ निवडले जातात कीं, त्यांस कौन्सिलांत इंग्रजींत चाललेला वादविवाद समजत देखील नाहीं, असें ऐकिवांत आहे, हें खरें असल्यास लोकांनीं केलेल्या निवडणुकींत अशी चूक कधींही होणार नाहीं. सरकारच्या व्यवस्थेंत बिलकूल बिघाड न होतां आमची जर समजूत होत आहे, तर ती सरकारानें कां करूं नये? शिवाय आपणांस सरकाराजवळ नवें असें कांहींच मागावयाचें नाहीं. वडील मनुष्यें ज्याप्रमाणें लहान मुलांस एखादा धडा पाठ करण्यास सांगून तो पाठ केल्यावर त्यांस एखादी खेळाची वस्तु किंवा खाऊ देण्याचें वचन देऊन, तो धडा पाठ झाल्यावर तें वचन पूर्ण करितात, त्याप्रमाणें आपल्या सरकारानें आपणांस पुष्कळ वचनें देऊन ठेविलीं आहेत. आपणांस त्यांतला एक एक धडा पाठ करून दाखवून तीं वचनें मोठ्या लडिवाळपणानें पूर्ण करून घ्यावयाचीं आहेत. हीं सर्व धोरणें आपणांस संभाळलीं पाहिजेत. एवढें करून आपलें काम संपलें नाहीं. सर्व धोरणें संभाळून मोठ्या सयुक्तिक रीतीनें आपणांपैकीं थोड्याशा लोकांनीं कांहीं मागणें केल्यास त्याचा विचार होत नाहीं. कांहीं उदार व समंजस लोक त्याचा आदर करोत, पण बहुतेक इंग्रज कामगार व वर्तमानपत्रकार असें ह्मणतात कीं, हें मागणें कांहीं सुशिक्षित, महत्त्वाकांक्षी व अतृप्त अशा पुण्याकडील ब्राह्मण लोकांकडून, बंगाल्यांतील बाबूलोकांकडून, व मद्रासेंतील आयालोकांकडून झालें आहे. बाकी एकंदर जनसमूह या गोष्टीविषयीं अगदीं बेफिकीर आहे, ह्मणून हें मागणें एकदेशीय आहे. याचा

विचार करण्याची कांहीं गरज नाहीं. ह्मणून आपण कोणचेंही माग
केल्यास, तें सार्वत्रिक झालें पाहिजे. हिंदुस्थानांतील एकंदर लोकां
मिळून मागणें केल्याशिवाय कोणीही दाद घेणार नाहीं. सर्व लोकां
डून मागणें होण्यास लोकांत आस्था उत्पन्न झाली पाहिजे, तिचा
पूर्ण अभाव आहे. लोकांचे आंगची शिथिलता नष्ट झाल्याशिवाय लो
सार्वजनिक कामांविषयीं कळकळ बाळगणार नाहींत, व ती शिथिल
नष्ट होण्यास लोकांचे अंगीं ज्ञान आलें पाहिजे, व तें आल्याशिवा
आपलें कार्य तडीस जाणार नाहीं. ह्मणून लोकांचें अज्ञान नाहींसें क
रून, त्यांचे मनांत सार्वजनिक कामांची कळकळ उत्पन्न होईल, असे उपा
आपण प्रथम योजिले पाहिजेत. सर्व उपायांचें मूळ व ज्ञानाचें आदि
बीज विद्या आहे; ह्मणून विद्येचा प्रसार सर्व जातींत व सर्व लोकां
जितका करवेल तितका केला पाहिजे. साधारण लिहितां वाचतां येणें
हिशेब करतां येणें, व स्वल्प अशीं वर्तमानपत्रें वाचतां येणें, इतपत ज्ञा
सर्व मनुष्यांस असलें पाहिजे. आतां आपण इतके प्रयत्न केले, त
कांहीं लोक अशिक्षित राहतील त्यास उपाय नाहीं; तसे इंग्लंड, जर्मन
वगैरे देशांतही आहेत. तरी पण, होईल तितका कनिष्ठ प्रतीच्या शि
क्षणाचा प्रसार झाल्याशिवाय कोणत्याही प्रयत्नांस जोर येणार नाहीं
उच्चप्रतीच्या शिक्षणाचीही हेळसांड करून उपयोग नाहीं. आज मितीस
जे आपणांत कांहीं विद्वान निपजले आहेत, व जे रात्रंदिवस देशहिताच्य
योग्य उपायांचे चिंतनांत निमग्न झाले आहेत, ते गृहस्थ या उच्चप्र
तीच्या शिक्षणाचींच फळें होत. ह्मणून दोन्ही प्रकारच्या शिक्षणाच
प्रसार अत्यावश्यक आहे. लोकशिक्षणाचें दुसरें बलवत्तर साधन, विचार
पूर्वक, मुद्देसूद, सुबोध व चटकदार भाषेंत लिहिलेलीं वर्तमानपत्रें व मासिक
पुस्तकें याचा फैलाव. ह्या उपायांपासून लोकांचे मनावर विलक्षण परिणाम
घडतात. तिसरा उपाय आपणांस प्रस्तुत ज्या ज्या अडचणी आहेत, त्या सर्व
लहानशा पुस्तकरूपानें छापून काढाव्या, व त्याच्या प्रति महाराष्ट्राक
रितां मराठी, गुजराथेकरितां गुजराथी, अशा रीतीनें सर्व देशभाषांत काढून
सर्व लोकांत फुकट वांटाव्या, व त्याच्याच इंग्रेजी प्रती विलायतेस पा
ठवून तेथें वांटण्यांत याव्या. व हल्लीं व्हॉइस ऑफ् इंडियासारखीं जीं
पत्रें आहेत, तींही तशींच चालू असावीं. शिवाय स्टेट्समन् पत्रांत कोणी प



त्रद्वारें सूचना केली आहे कीं, "राष्ट्रीय सभेस जमणाऱ्या मंडळीनें आपा
पल्या प्रांतांतील हरएक बाबतींत असलेले दोष किंवा अडचणी यांची
याद करून न्यावी, त्यावर आपले विचार किंवा टीका बिलकूल करूं नये."
अशा सर्व यादी राष्ट्रीय सभेंत वाचण्यांत याव्या; मग त्यांपैकीं ज्या
गोष्टी सर्व हिंदुस्थानास सारख्या लागू असतील, त्या पुस्तकरूपानें छा
पून काढाव्या, व त्याच्या प्रती हिंदुस्थान व विलायत येथें सर्वत्र वांट
ण्यांत याव्या; आणि एक एक प्रत स्थानिक व हिंदुस्थानसरकाराकडे पा
ठवावी; व त्याबरोबर सरकारास अशी विनंती करावी कीं, "या लिहून
पाठविलेल्या गोष्टी सर्व खऱ्या आहेत असें ह्मणण्याचा आमचा विशेष
आग्रह नाहीं; सरकारानें त्याचा पूर्ण विचार करून, योग्य दिसल्यास त्यां
पैकीं कांहींचें तरी निवारण व्हावें, व साल अखेर ह्यांपैकीं सरकारानें
कोणती अडचण दूर केली, हें कळविण्यांत यावें." कदाचित् सरकारानें
या विनंतीकडे दुर्लक्ष केलें, तर तें सभेच्या दप्तरीं लिहून ठेवावें अशी
स्थिति कदाचित् एक दोन वर्षें चालेल; पण पुढें इंग्लंडांतील लोकांचें या
गोष्टीकडे लक्ष जाईल. कारण जे लोक एव्हांपासूनच राष्ट्रीय सभेविषयीं
विचार करूं लागले आहेत, त्यांचेकडून सहजच असा प्रश्न निघेल कीं,
"राष्ट्रीय सभेच्या ह्मणण्याचा विचार हिंदुस्थान सरकारानें काय केला?
सभेचें ह्मणणें खरें असल्यास त्याप्रमाणें बंदोबस्त व्हावा; नाहीं तर सभेचें ह्म
णणें खोटें आहे असें तरी ह्मणावें. असा प्रश्न उत्पन्न झाल्यावर येथील सर
कारास त्याचा विचार करणें भाग पडेल, व त्यापासून आपला कांहीं तरी
उपयोग होईल." ही सूचना अमलांत आणल्यास ही फायद्याची आहे. चौथा
उपाय. विद्वानांकडून व्याख्यानद्वारा लोकांस उपदेश होण्यास ज्याप्रमाणें
या शहरांत हेमंतोत्सव, हिंदु युनिअन् क्लब्, शास्त्रीय व्याख्यानमाला इ
त्यादि व्याख्यानप्रसंग आहेत, तसाच आमचे पुण्यांत वसंतोत्सव आहे,
तर अशा प्रकारचे प्रसंग शेंकडो आणले पाहिजेत, व त्यांपासून सामान्य
जनांस अनेक विषयांचें ज्ञान अल्प आयासानें करून दिलें पाहिजे. हीं
सर्व कामें करण्यास विद्वान व पुढारी गृहस्थांनीं अंतःकरणपूर्वक झटलें
पाहिजे, तरच उपयोग होणार आहे. हें लोकहिताचें काम परमार्थकृत्य
ह्मणून केलें तरच तडीस जाणार आहे. पूर्वींचे लोक शेंकडों राजकीय व
व्यावहारिक खटपटी संभाळून तास दोन तास तरी स्नानसंध्येंत घाल-

वीत असत. हल्लींच्या लोकांचा वेळ तसा खर्च होत नाहीं ( हें चांगलें किंवा वाईट हा प्रश्न वेगळा आहे, त्याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. ) व तोच वेळ त्यांनीं ह्या परमार्थाकडे खर्च केला तर ज्यास्त श्रेयस्कर होईल. खरोखरच परोपकारासारखें पुण्य नाहीं. प्रत्यक्ष रामचंद्रही "सीतेहून किंवा प्राणाहूनही मला लोकसेवा ज्यास्त प्रियकर आहे" असें ह्मणत असत. असो. विद्वानांचे उपदेशांचा लाभ शहरचे लोकांस होईल पण बाहेरगांवचे लोकांची वाट काय? वाचनापेक्षांही श्रवणानें पुष्कळ कार्य होतें. आज मितीस लक्षावधि अशिक्षित लोकांवर धर्माचे व नीतीचे जे संस्कार घडले आहेत, ते फक्त श्रवणानें घडले आहेत, या लोकांनीं भगवद्गीता किंवा तुकारामबोवाचे अभंग कधींच वाचले नाहींत. केवळ कथापुराणांचें श्रवण व वडिलांचा उपदेश यांचेंच हें फळ होय. ह्मणून विद्वान लोकांनीं, मुद्देसूद, सयुक्तिक व चित्तवेधक भाषण करणारे वक्ते पसंत करून गांवोगांव लोकांस उपदेश करण्याकरितां पाठवावे. सार्वजनिक सभेनें स्थानिक स्वराज्याची माहिती करून देण्याकरितां अशा वक्त्यांची योजना केली होती. तशीच योजना नेहमीं सुरू केल्यास फार उपयोग होईल. आयासावांचून लोकांस ज्ञान प्राप्त होऊन त्यांस सार्वजनिक कामांविषयीं कळकळ उत्पन्न होईल. मग सहजच ते पुढारी लोकांच्या प्रयत्नास अनुसरणारे होतील. आतां यानंतरचा उपाय आपल्या राष्ट्रीय सभेस पूर्णता आणणें हा होय. गेल्या डिसेंबरमध्यें या मुंबई शहरांत राष्ट्रीय सभा भरली होती, व यंदां ती कलकत्यास भरणार आहे. आज मितीस या सभेस राष्ट्रीय सभा हें नांव वास्तविक पाहतां पूर्णपणें लावितां येत नाहीं. यावरून मी त्या सभेस नांवें ठेवतों असें कोणीं समजूं नये; व सभेंत जमणारे सभासद, आमचे पुढारी व योग्य मुक्त्यार नाहींत, असें ह्मणण्याचाही माझा उद्देश नाहीं. सभेच्या बाल्यावस्थेस अनुरूप असेंच तिचें स्वरूप आहे. परंतु आपण जर सरकाराजवळ, स्थानिक व हिंदुस्थान सरकारचे कायदेकौन्सिलांत लोकांनीं निवडलेले सभासद असावे, अशाविषयीं मागणें मागणार, तर आपल्या सभांतून कायदेशीर रीतीनें लोकांनीं निवडलेल्या सभासदांची आवश्यकता नाहीं काय? आपल्या राष्ट्रीय सभेस अशा प्रकारचें योग्य प्रतिनिधित्व आणण्यास गांवोगांव सभा स्थापन झाल्या पाहिजेत, व त्या



सर्वांचीं सूत्रें परस्परांशीं जोडलेलीं पाहिजेत. प्रत्येक तालुक्याच्या गांवीं एक एक सभा असली पाहिजे. तालुक्यांतील सभेनें आपणांपैकीं कांहीं लोक जिल्ह्याचे सभेंत पाठवावे. जिल्ह्याच्या सभेंत सर्व तालुक्यांतील व जिल्ह्याचे शहरांतील सभासद असावे. जिल्हासभेनें आपणांतील कांहीं सभासद प्रांतिक सभेंत पाठवावे; व प्रांतिकसभेंतील कांहीं सभासद इलाख्याचे सभेंत पाठवावे. त्याचप्रमाणें तालुक्यांतील सभेच्या शक्तिबाहेरील कामें जिल्ह्याचे सभेकडे सोंपवावीं, व जिल्हासभेनें आपणास न झेपणारीं कामें प्रांतिक सभेकडे पाठवावीं. प्रांतिकसभेनें यांतील त्या प्रांतासच लागू अशा गोष्टींच्या बंदोबस्ताचा प्रयत्न स्वतंत्र रीतीनें करावा, व त्याहून विशेष महत्त्वाचीं कामें इलाख्यांतील सभेकडे सादर करावीं. अशा रीतीनें मुंबईचे सभेस केवळ मुंबईचीच सभा असें ह्मणतां येणार नाहीं, तर त्या सभेंत सोलापूर जिल्ह्यांतील करमाळें तालुक्याचाही अंश येऊं शकेल. अशा रीतीनें सिद्ध झालेल्या मुंबईच्या सभेनें आपणांतील कांहीं मुखत्यार राष्ट्रीय सभेस पाठवावे, व त्यांच्या द्वारें आपल्या इलाख्यांतील एकंदर अडचणी राष्ट्रीय सभेस कळवाव्या. व त्याचप्रमाणें, राष्ट्रीय सभेंत झालेले वादविवाद किंवा ठराव यांचा पेंड थेट तालुक्याचे सभेपर्यंत जाऊन पोंचावा. अशा रीतीनें सर्व देशभर सभांचें जाळें पसरून कामाची व्यवस्था लागली ह्मणजे, राष्ट्रीय सभेस पूर्णावस्था प्राप्त झाली असें ह्मणतां येईल. मग राष्ट्रीय सभेनें केलेली मागणीही सर्व हिंदुस्थानांतील लोकांची मागणी आहे, असें या देशाचें उणें पाहणारांसही कबूल करावें लागेल. अशा प्रकारची स्थिति प्राप्त झाल्यानंतर मीं पूर्वीं सांगितलेलीं सर्व धोरणें संभाळून राष्ट्रीय सभेमार्फत, आपलीं सार्वजनिक कामें करण्याविषयीं अर्ज करावा. त्या अर्जावर निदान दोन कोटि सह्या असाव्या. कारण एखादा अर्ज इकडून पाठविल्यास त्यावर सह्या किती आहेत, ह्याचा विचार तिकडचे लोक करतात, व "हिंदुस्थानांत २९ कोटि प्रजा असून अर्जावर फक्त ९० हजारच सह्या आहेत" तर हा अर्ज सर्व संमत नाहीं, ह्मणून याचा विचार करतां येत नाहीं. ह्मणून अर्जावर दोन कोटि सह्या असल्यास त्याची दाद लागेल; व वर सांगितलेले सर्व उपाय योजिल्यावर समाज सज्ञान होऊन दोन कोटि सह्या मिळण्यास कठीण पडणार नाहीं. असो. येथवर

इकडली व्यवस्था नीट लागली. आतां आपणास इंग्लंडाकडे नजर दिली पाहिजे. कारण आपल्यास आपल्या इंग्रज सरकारापासून सार्वजनिक कामें करून घ्यावयाचीं आहेत. आमचें इंग्रज सरकार कोण? येथें असणारे सर्व अधिकारी हे इंग्रज सरकारचे बडेबडे नोकर होत. त्यांच्याशीं आह्मांस नेहमीं घासाघीस करावी लागणारच; कारण अधिकारी पुरुषास दुसऱ्यास स्वातंत्र्य देऊन आपल्या सत्तेस कमीपणा येऊं देणें खपत नाहीं. (हल्लींच्या आपल्या लॉर्ड रे साहेबांसारख्या उदार पुरुषांची गोष्ट वेगळी. अशीं माणसें फार थोडीं असतात.) ह्मणून आपल्या खऱ्या मालकांकडे आपणांस फिर्याद न्यावी लागेल. व ते खरे मालक ह्मणजे इंग्लंडांतील एकंदर जनसमूह अथवा त्या समूहानें निवडून दिलेले पार्लमेंटचे ६०० सभासद. या लोकांस दाद मागणें ह्मणजे आमची खरी स्थिति त्यांस कळविली पाहिजे. ती कळविण्याचे मार्ग तीन. एक, मीं पूर्वी सांगितलेल्या प्रकारचीं लहान पुस्तकें व वर्तमानपत्रें यांचा तिकडे फैलाव; दुसरें, हल्लीं आलेले लॉर्ड रोजबरी यांसारख्या बड्या पाहुण्यांचा सत्कार करून, आपले हितचिंतक प्रोफेसर वर्डस्वर्थ व सर वेडरबर्न यांचे मध्यस्थीनें त्यांस आपली खरी स्थिति समजून देण्याचा प्रयत्न व्हावा. आपण इंग्लंडांत जाऊन त्या लोकांस इकडची हकीकत कळविणार त्यापेक्षां ती त्यांस प्रत्यक्ष येथें दाखविली तर फार चांगली कळेल.

तिसरा मार्ग, नामदार दादाभाई नौरोजी व लाल मोहन घोस ह्या पुरुषांस द्रव्याची मदत करून पार्लमेंटचे सभासद होण्याची खटपट करण्याकरितां विलायतेस राहूं द्यावें. हे गृहस्थ विलायतेस राहिल्यानें तेथील बड्या लोकांस आपल्या वास्तविक स्थितीचें खरें ज्ञान करून देतील, व आपल्या या शहरांतील प्रसिद्ध वक्ते रा० रा० नारायण रावजी चंदावरकर अशा गृहस्थांस मदत करून तिकडे पाठवावे; ह्मणजे इंग्लंडांतील सर्व प्रकारच्या लोकांस आपली खरी स्थिति ते समजून देतील. ह्याप्रमाणें इंग्रज सरकारास आपली खरी स्थिति समजली ह्मणजे राष्ट्रीय सभेकडून सर्व अडचणी दाखवून समर्याद भाषेनें लिहिलेला व त्यावर २ कोटि लोकांच्या सह्या आहेत असा अर्ज पाठविण्यांत यावा. मग तो अर्ज पुढें करून वक्त्यांनीं मोठ्या नम्र वाणीनें इंग्रज सरकारच्या न्याय-

सं.नि. ३



नं. २२

देवतेस, समतेस व स्वातंत्र्यप्रीतीस जागृत करावें तें असें—"आपण अत्यंत स्वातंत्र्याभिलाषी आहां. आह्मी हिंदुस्थानची प्रजा केवळ तुमच्या आश्रयाखालीं आहों. आपण पदरचे १९२ कोटि रुपये खर्च करून गुलामाचा व्यापार बंद केलात, त्या आपणांस आपल्या हाताखालच्या अतिदीन २९ कोटि प्रजेची कांहींच करुणा येऊं नये काय? आमच्या या देशासंबंधानें २ चमत्कार झाले आहेत, व तिसरा आपण करून दाखवूं असें ह्मणत आहां. पहिला चमत्कार. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या अमलाखालीं बहुत कालपर्यंत राहत नाहीं; परंतु आज कित्येक वर्षें परकीय अमलाखालींच आहों. दुसरा चमत्कार असा कीं, एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रावर समाधानकारक सुव्यवस्थित अमल चालवितां येणें कठिण, तो आपण आमचेवर फारच उत्तम रीतीनें करीत आहां. तिसरा चमत्कार, "आपणासारिखे करिती तात्काळ." हें जें संतांचें लक्षण त्याप्रमाणें आपण आह्मांस आपल्यासारखे शहाणे करून आमचें राज्य आमच्या स्वाधीन करणार व त्यांतच धन्य मानणार असें ह्मणतां! ही गोष्टही कालेंकरून आपण खरी करून दाखवाल अशी उमेद आहे. कारण आपल्या या दिव्यखाणींतून लार्डरिपनसारखे, मि० ग्ल्याडस्टनसारखे, जॉन ब्राइटसारखे तेजोमय हिरे निर्माण झाले आहेत. अशा रत्नांचा प्रकाश कालेंकरून जगास दिपवून टाकील यांत संशय नाहीं. नुस्त्या इंग्लंड किंवा हिंदुस्थानच्याच काय, पण जगाच्या इतिहासांत सोन्याच्या शाईनें लिहून ठेवण्यासारखा अद्भुत चमत्कार आपलें हें इंग्लिश राष्ट्रच करून दाखवील, असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे, ह्मणूनच आह्मीं आपली विनवणी करतों, इकडे लक्ष पुरवून आमच्या अडचणी दूर करण्याचें मनावर घ्यावें". अशा रीतीनें त्या सदय लोकांस आळिवल्यावर त्यांचीं मनें खास द्रवतील, मग आपलीं सार्वजनिक कामें करण्याविषयीं त्यांची खास प्रवृत्ति होईल, व ती व्हावी अशाविषयीं राजनिष्ठापूर्वक उपाय हाच आहे, अशी माझी समजूत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# विषय १ ला.

मुंबईतील महाराष्ट्रवक्तृत्वोत्तेजक मंडळीच्या सन १८८६ सालच्या भाषणसमारंभांतील पहिल्या विषयाच्या परीक्षककमिटीचे प्रमुख रा० ब० शंकर पांडुरंग पंडित यांनीं तारीख १७ माहे डिसेंबर सन १८८६ रोजीं भाषण केलें त्याचा सारांश.

ह्या सभेचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं ज्या गृहस्थांनीं परिश्रम केले त्या पुरस्कर्त्यांचे सर्वांनीं आभार मानिले पाहिजेत.

असे प्रसंग बनून आल्यानें मोठा फायदा असा आहे कीं, अनेक महत्त्वाचे प्रश्न बहुत लोकसमाजापुढें वाटाघाटीकरितां ठेवतां येतात.

साधारणपणें एकंदर भाषणें चांगलीं झालीं.

उमेदवारांकडून विषयाचा अभ्यास व्हावयास पाहिजे होता तसा झाला नव्हता. तथापि भाषण आणि तें करण्याचें धैर्य, ह्या दोन गोष्टींच्या संबंधानें पाहिलें तर समारंभ चांगला झाला असें ह्मटलें पाहिजे.

अशा प्रसंगीं जे उमेदवार बोलण्यास येतात त्यांजकडून फार उत्तम भाषणें होतील अशी अपेक्षा करणें वाजवी नाहीं. कारण असले भाषणसमारंभ हे खरे प्रसंग नव्हेत. अगोदर नेमून दिलेल्या विषयावर बरीच तयारी करण्याजोगा अवकाश देऊन उमेदवार लोकांस मोठ्या समुदायापुढें उभें राहून बोलण्याची शक्ति कितपत आहे हें तपासून पाहण्याच्या हेतूनें समजून उमजून सोंगाच्या बतावणीप्रमाणेंच हे भाषणसमारंभ योजले आहेत. ह्मणून अशा सभांपुढें झालेल्या भाषणास खऱ्या प्रसंगीं होणाऱ्या भाषणांची सर यावयाची नाहीं. तरी खऱ्या सभांपुढें खऱ्या प्रसंगीं लोकांच्या प्रवृत्तीसाठीं खरीं भाषणें होतांना यांतीलच कांहीं वक्त्यांनीं बोलण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांचीं भाषणें याहून चांगलीं झालीं असतीं असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. एकाच विषयावर अनेक उमेदवारांचीं भाषणें होत असलीं, आणि तीं उलट सुलट अशा बाजू घेऊन न बोलतां एक पक्षीं होऊं लागलीं ह्मणजे, असल्या भातुकलीच्या सभांमध्यें अशा प्रकारच्या वक्त्यांविषयीं प्रेम राहात नाहीं. त्यामुळें श्रोते गडबड करूं लागले ह्मणजे वक्त्यांचा हिरमोड होतो. हें श्रोत्यांनीं फार ध्यानांत ठेवलें पाहिजे.

श्रोते मंडळीस अशी सूचना आहे कीं, उत्तम भाषण ह्मणजे शब्दांचा अस्खलित प्रवाह वाहात असावा ही समजूत खरी मानून त्यांत कांहीं न्यून दिसतांच काठ्यांचे व टाळ्यांचे गजर होत असतात. तरी त्यांस न जुमानतां कित्येक वक्ते आपला विषय शेवटास नेतात. त्यांच्या बोलण्यांत श्रोत्यांस रुचण्यासारखा पुष्कळसा भाग नसला, तरी बोलण्यास घेतलेला विषय मध्यंतरी घाबरून न सोडतां निश्चयानें तडीस नेऊन सोडतात. हें एक प्रकारचें स्तुत्य धैर्य आहे.

ह्या समारंभांत झालेल्या भाषणांपैकीं कोणतींही भाषणें वर्तमानपत्रांत होणाऱ्या वाटाघाटी पलिकडे अभ्यास करून झालेलीं अशीं दिसलीं नाहींत.

कितेक बोलणाऱ्यांनीं विषयाचे भाग फार केल्यामुळें विषयाच्या एका देशाविषयींच बो-

लतां बोलतां वेळ संपून जाई. त्यामुळें एका देशालाच फार महत्व दिल्यासारखें होत असे. यावरून बोलण्यास मिळालेला वेळ किती आहे तें ध्यानांत ठेवून विषयांतील मुख्य मुख्य मुद्दे असतील त्यांचे थोडे भाग करावे आणि मग त्यांतून कांहीं ठकळ मुद्दे घेऊन त्यांजवर भाषण करावें. असें केल्यानें पसारा फार न वाढतां विवेचनाचा विषय व्यवस्थितपणें श्रोत्यांच्या मनांत भरविण्यास वेळ पुरेल; व यथाक्रम असल्यामुळें तो त्यांच्या मनांत शिरण्यास जड जाणार नाहीं.

भाषणामध्यें अलंकार फारसा आणूं नये. कारण अलंकारिक भाषेनें खुबीदार बोलणें फार थोडक्यांस साधतें. तसें न साधल्यानें श्रोत्यांचीं मनें चंचल होऊं लागतात.

साधारणतः, पण विशेषेंकरून वेळ थोडका असल्यामुळें, भाषणामध्यें दुसऱ्याच्या लेखांतले किंवा बोलण्यांतले वेंचे घेऊन ते वाचणें किंवा पाठ ह्मणणें हें बरोबर नाहीं. ह्या योगानेंही श्रोत्यांचीं मनें चंचल होतात.

आपल्या देशांतील पूर्वकालच्या संप्रदायाप्रमाणें वक्ते ह्मटले ह्मणजे हरदास, व पुराणिक, इत्यादिक हेच होत. त्यांची वाणी सर्वच गाण्याच्या सुरासारखी असल्यामुळें त्यांच्या भाषणांत श्लोक वगैरे कविता ह्मणण्यांत आल्या तरी त्या चांगल्या शोभतात. परंतु प्रस्तुत समारंभांत झालेल्या भाषणाप्रमाणें होणारीं आमचीं अधुनिक भाषणें गद्यरूप व संभाषणासारखीं असल्यामुळें त्यांत पद्यरूप गायनात्मक कविता शोभत नाहींत. आणि त्या जर कठीण किंवा अप्रसिद्ध असल्या ह्मणजे तर श्रोत्यांचीं मनें फार चलविचल होतात. याकरितां अत्यंत आवश्यकता असल्याखेरीज अशा प्रकारच्या भाषणांत कविता वगैरे ह्मणणें बरें नाहीं.

हे प्रसंग खरे नव्हेत. सोंगासारखे आहेत. हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्मणून अशा समारंभांतील असल्या भाषणांनीं श्रोत्यांच्या मनावर चांगलासा ठसा उठविणें हें फार कठीण आहे हेंही सांगितलेंच आहे. याकरितां वक्त्यांनीं अत्यंत महत्वाची अशी एक गोष्ट ध्यानांत धरून ठेवावी कीं, अशा समारंभांत बोलण्याकरितां जे विषय नेमले असतील, त्यांपैकीं जो विषय आपल्या स्वतःच्या मताविरुद्ध प्रतिपादन करण्याचा प्रसंग असेल तसल्या विषयावर बोलण्याचा प्रयत्न करूं नये. कारण आपल्या मताविरुद्ध बोलण्याचा प्रसंग असला ह्मणजे आधीं वक्त्याचाच दिल खुला न होतां तो संकोच पावत असतो. त्यामुळें वक्ता कितीही चतुर असला तरी त्याच्यानें आपला स्वतःचा दिल खुला करून आपल्या वाक्चातुर्यानें श्रोत्यांच्या मनावर इष्ट हेतूचा चांगला प्रकाश पाडून त्यांचे दिल खुले करून त्यांस उल्हासीत करणें हें कदापि घडत नाहीं. ह्मणून बोलणाऱ्यांनीं सहसा अशा भरीस पडूं नये.

कोणत्याही विषयाचा अभ्यास करतांना आपणास पुष्कळ वाचावें लागतें. परंतु भाषणास वेळ थोडा असल्यामुळें तितकें सगळें बोलतां येत नाहीं. यास्तव थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थाचा समावेश होईल अशा तऱ्हेच्या भाषेची भाषणांत योजना करावी. उगीच पाल्हाळीक शब्द घालूं नयेत. किंवा श्रोत्यांच्या मनाचा कल पाहून केवळ वेळा



पुरतें ह्मणजे आपल्या मताविरुद्ध असें भाषण करूं नये. तसें केल्यानें वेळाची तूट पडून घोंटाळा फार होतो. ह्मणून असल्या प्रकारचा सर्व पाल्हाळ सोडून द्यावा.

झालेल्या भाषणामध्यें विषयाच्या संबंधानें मुख्यत्वें दोन दोष होते. त्यांत पहिला दोष असा होता कीं, सभेनें नेमून दिलेल्या विषयाचा उलट पक्ष कोणीच उचलला नाहीं. दुसरा दोष असा होता कीं, आह्मांस सरकाराकडून अनेक सार्वजनिक कामें करून घ्यावयाचीं आहेत. तीं करण्याविषयीं सरकारची प्रवृत्ती व्हावी यास कोणते उपाय योजावे यावरच सगळीं भाषणें झालीं. परंतु कामें कोणतीं व तीं आपणांस खरोखर आवश्यक आहेत कीं काय ? असल्यास कशामुळें आवश्यक झालीं आहेत याविषयीं कोणी दिग्दर्शनही केलें नाहीं. वस्तुतः इंग्लिशांचें राज्य होण्यापूर्वी आमची स्थिति होती ती हल्लींच्या आमच्या स्थितीहून ( ती बरी असो, अथवा वाईट असो ) फार भिन्न होती. त्या भेदाचीं कित्येक कारणें इंग्रजांचें राज्य झाल्यामुळेंच उत्पन्न झालीं आहेत. उदाहरण, रोगांची वृद्धी व लढाई इत्यादि प्राणहानीचे प्रसंग इंग्रजी राज्य झाल्यापासून नाहींसे होत गेल्यामुळें प्रजेची वृद्धी अतिशय होत आहे. गांवांतल्या गांवांत, किंवा प्रांतांतल्या प्रांतांत जातीसंबंधी, जमिनीसंबंधी, व सामान्यदेवघेव अथवा दुसरे व्यवहार यांसंबंधी, आमच्या देशांत पूर्वीं पंच मार्फत न्याय मनसुबी होत असे. पण ती न्यायरीति इंग्रजी राज्य झाल्यानंतर बंद केली. पंचलोक निःपक्षपातानें न्याय करीत नाहींत. अथवा लांचलुचपत खाऊन पक्षपातानें न्यायाचें काम करतात. असे दोष वाटल्यामुळें पंचाइतीनें न्याय देण्याचा प्रकार बंद केला. आणि तें न्यायाचें काम करण्यास एकावर एक अशीं चढत्या पायरीचीं कोर्टें स्थापन केलीं. तेणेंकरून न्यायाचा खर्च फार वाढला. खोटा दावा आणणें, खोटी साक्ष देणें, व खोटे कागद करणें, इत्यादि अपराध पूर्वींपेक्षां अलीकडे फार होऊं लागले आहेत. यास्तव ज्यांच्या राज्यकारकीर्दीमुळें आपल्या स्थितींत असला फेरफार झाला त्या राज्यकर्त्यांपासूनच त्या फेरफारामुळें होणाऱ्या पीडेचें निवारण होण्याजोगें औषध करण्यासाठीं हक्क मागून घेतले पाहिजेत. आह्मांस तूर्त आवश्यक असलेल्या अशा प्रकारच्या हक्कांचें दिग्दर्शन झालें पाहिजे होतें.

बहुतेक वक्त्यांच्या भाषणांमध्यें असें सांगण्यांत आलें कीं, "इंग्रजसरकारापासून हक्क मिळविणें हें फार कठीण नाहीं. राज्यकर्त्यांविषयीं वर्तमानपत्रांत सौम्य लेख असावे. त्यांच्याविषयीं आपली पूज्यबुद्धि असावी. त्यांच्या दर्शनास आपण वरचेवर जात असावें. त्यांच्या ओळखी पुष्कळ असाव्या. त्यांच्याशीं फार दळणवळण ठेवावें. हिंदुस्थानांत आणि विलायतेंत या हक्कांविषयीं भाषणें करणारे लोक नेमावे. आणि कोट्यावधी लोकांच्या सह्यांचे मोठमोठे अर्ज करून ते पार्लमेंन्ट सभेस पाठवावे. ह्मणजे इंग्रजलोक स्वातंत्र्यप्रिय आहेत ते आपणांस स्वतंत्रतेचे अनेक हक्क देतीलच. आणि देतील ह्यांत नवलही नाहीं. कारण महाराणीसाहेबांच्या जाहिरनाम्यांत बहुतेक हक्क त्यांनीं आपण होऊनच दिले आहेत. तेच थोडथोडे वाढवावयाचे आहेत." असा भावार्थ होता.

आतां हे जे उपाय सांगितले ते स्वप्नांतील राज्यासारखे आहेत. सर्वांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं हक्क ह्मणजे अधिकार, अधिकार ह्मणजे राज्य, आणि हक्क देणें ह्मणजे

राज्याचा भाग तोडून देणें होय. ह्या जगांतील राष्ट्रांमध्यें जेथील सर्व प्रजाजन साधु आहेत. असें कोणतेंही राष्ट्र नाहीं. ह्या नियमास हालींचे राज्यकर्ते अपवाद आणीत नाहींत. याकरितां वक्त्यांनीं जे सौम्य व कांहींसे साधे उपाय सांगितले, त्याचें तात्पर्य इतकेंच समजावयाचें कीं जे कोणतेही उपाय आपणांस कर्तव्य असतील ते राजभक्तिपूर्वक असले पाहिजेत. परंतु हें उपायांचें केवळ एक अंग आहे. उपाय ते निराळेच.

ते कोणते? ध्यानांत आणा कीं, आपल्या देशांत भिक्षुकीची व्याप्ति फार आहे. आचारांत, विचारांत, व भाषेंत देखील भिक्षुकी प्रधान गणली जाते. उदाहरण. कष्टानें मिळविलेल्या संपत्तीविषयीं कांहीं सांगावयाचें असल्यास सुबत्ता, समृद्धि इत्यादि शब्द त्यास्थळीं न योजतां सुभिक्ष आहे. असें आपण प्राचीन कालापासून ह्मणतों. आणि त्याच्या विरुद्ध स्थितीला दुर्भिक्ष असें ह्मणण्याचा पाठ पडला आहे. त्या अनुरोधानें वक्ते लोकांनीं "चांगली भिक्षुकी करा, ह्मणजे इंग्रज लोक तुह्मांस देतील" असें सांगितलें हें साहजिकच आहे. तथापि भिक्षुकी करण्यास गेलें तरी देणाऱ्यांस असें वाटलें पाहिजे कीं, हा भिक्षुक तयारीचा, निश्चयाचा, आणि पाठबळाचा माणूस आहे. त्याच्या सुखचर्येकडे पाहणारांस हा मागत आहे ती वस्तु यास देण्यास योग्य आहे व हा तिचा योग्य उपयोग करील असें वाटलें पाहिजे. तेव्हां संपत्तीचें पाठबळ ह्मणजे व्यापार, कलाकौशल्य वगैरे वाढविलें पाहिजे. सुखचर्येचें पाठबळ ह्मणजे विद्यावृद्धि झाली पाहिजे. आणि सोबतीच्यें पाठबळ ह्मणजे साधारण प्रजेची विद्या व समजूत पुष्कळ वाढविली पाहिजे. आणि सर्वांत मोठें पाठबळ ह्मणजे स्थानिकस्वराज्यादिक जे स्वतंत्रतेचे हक्क ते घेऊन तें भोगण्यास योग्यता आली पाहिजे. उत्कर्षभोगी जे परदेशीय लोक त्यांस आपण निःसत्व आणि निस्तेज आहों असें दिसतां कामा नये. व आह्मांसही वाटतां कामा नये. कारण ज्याचा त्यास भरंवसा नसला तर दुसरीं मनुष्यें त्यावर सहसा भरंवसा ठेवीत नाहींत. देणाऱ्या दात्यास असें वाटावें कीं, ह्याला कांहीं दिलें असतां हा दुसऱ्या कोणास हिसकावून घेऊं न देतां चांगलें संरक्षण करून आपले जवळ ठेवील. आणि उपभोग घेईल. याकरितां कमजोरी येऊं नये ह्मणून लवकर लग्नें करूं नका. आरोग्यसंपत्ती चांगली राहील असें करा. संतती थोडी पण ती बळकट होईल असें करा. आणि एक मुख्य निर्धार धरा कीं, आपण सर्व भिक्षुक नाहीं. व प्राचीनकाळीं नेहेमीं भिक्षुक नव्हतों, याज्ञिक होतों. ह्मणून याज्ञिकी करण्यास तयार होऊं, ह्मणजे प्रसंग आल्यास आपलें द्रव्य, घरदार तर काय, पण रावणाप्रमाणें आपलें शीर तोडून बळी देऊन मिळालेले हक्क भोगण्यास व उदार राज्यकर्त्यांकडून दुसरे हक्क संपादन करण्यास आपण तयार आहों असें दाखवूं. यज्ञाशिवाय आजपर्यंत देव संतुष्ट झाले नाहींत. व पुढेंही होण्याचा संभव नाहीं. जे हक्क आपल्या उदार राज्यकर्त्यांनीं दिले आहेत ते भोगण्यास व आपल्या देशबांधवांकडून भोगविण्यास आपल्या वेळाचा, पैशाचा व बुद्धीचाही यज्ञ ह्मणजे खर्च करण्यास आपण तयार असलें पाहिजे. व त्याप्रमाणें पुढें दुसरे हक्क मिळविण्यास द्रव्याचा, बुद्धीचा, वेळाचा व मेहेनतीचाही यज्ञ केला पाहिजे. अशा तऱ्हेचे याज्ञिक होण्याची तयारी असणें हा मुख्य



उपाय आहे. ही तयारी असली ह्मणजे दुसरे उपाय काय करावे अशी विशेष चिंता करावी लागणार नाहीं.

---

## विषय २ रा याजवरील मुख्य परीक्षक रा. रा. दाजी आबाजी खरे ह्यांचे भाषणाचा सारांश.

१ खऱ्या वक्त्याचें लक्षण.

साधारण जनसमूहाचें आपल्या भाषणानें मन वळविणें व त्यांस आपले विचार खरे भासवून त्यांना आपल्या पक्षास आणणें.

२ खरा वक्ता स्वतःसिद्ध असतो. त्यास नियमांचा फारसा उपयोग घडूं शकत नाहीं. कविता, चित्रकला वगैरेप्रमाणेंच वक्तृत्व हें शिकवितां येत नाहीं. त्याला मूळचाच अंकुर असावा लागतो.

३ वक्त्यानें पाचकळपणा करून श्रोत्यांचे मनास कांहीं वेळ मौज वाटविणें हें खऱ्या वक्त्याचें काम नव्हे.

४ विद्यार्थी असतांना वक्तृत्वाकडे लक्ष्य दिल्यानें मनास व्यग्रता प्राप्त होऊन हातीं धरलेल्या अभ्यासास व्यत्यय येतो ह्मणून विद्यार्थी दशेंत तिकडे लक्ष्य देणें अयोग्य.

५ भाषा अतिशय क्लिष्ट, किंवा विशेष अलंकारयुक्त व मोठ्या व अवजड शब्दांनीं भरलेली असणें नीट नाहीं. साधारण कुटुंबामध्यें ज्या भाषेचा उपयोग होतो त्याच भाषेनें खरा वक्ता आपलें काम करतो.

---

## विषय ३ रा ह्यावरील प्रमुख परीक्षक रा. रा. गोविंद शंकर शास्त्री बापट ह्यांच्या भाषणाचा सारांश.

आपण कोणत्या प्रकारचें ज्ञान संपादावें हा मुलांकरितां विषय होता. विषयाची स्पष्ट परिस्फुटता नसल्यामुळें कांहीं मुलांनीं असा अर्थ केला कीं, आपण ह्मणजे लहान मुलांनीं कोणतें ज्ञान मिळवावें. हाच अर्थ कदाचित् विषय नेमणारांच्या मनांत असेल. असा अर्थ घेतल्यास वक्त्यांनीं सांगितलें त्याशिवाय विशेष सांगावयाचें आहे असें नाहीं. कारण आपण कोणतें ज्ञान संपादावें हें मुलांस कळत नाहीं व त्याचा विचार करणें हें काम त्यांचें नसून त्यांच्या पालनकर्त्यांचें आहे. सर्व प्रकारचें ज्ञान उपयुक्त आहे तरी कोणत्या प्रकारचें ज्ञान आपल्या मुलांस हितावह होईल किंवा प्राप्त करून देतां येईल हें पालनकर्त्यांच्या स्थितीवर अवलंबून असतें. विषय नेमला आहे त्यापेक्षां वरील अर्थाचें अवलंबन करून इतकेंच सांगणें पुरे आहे कीं, मुलांनीं विद्यार्थी, शिष्य, छात्र या शब्दांच्या अर्थास पात्र व्हावें. हीं तीन नांवें त्यांस प्राप्त होणारीं आहेत तर त्याप्रमाणें करणी करावी. 'विद्यां अर्थयते' ह्मणजे विद्या मागतो असा अर्थ आहे. याकरितां जसा एकादा याचक मिळेल तिकडे भिक्षा मागून होईल तितका संचय करितो तितका मुलांनीं ज्ञानसंपादनाविषयीं नेहमीं तत्पर असून होईल तितका ज्ञानसंचय करावा. 'शासितुं योग्यः' ह्मणजे हुकुमांत ठेव-

ण्यास योग्य तो शिष्य. असा अर्थ आहे तर मुलांनीं सर्वदां गुरु ह्मणजे शिक्षक किंवा
वडिल ज्यांपासून आपणांस ज्ञान प्राप्त होतें त्यांच्या आज्ञेंत रहावें ह्मणजे त्यांस संतोष
होऊन ते अधिक काळजीनें शिकवितील. आपली आज्ञा न पाळणाऱ्यास शिकवावें असें
कोणासही वाटणार नाहीं हें स्वाभाविक आहे. गुरोर्दोषाणामावरणं शीलं 'तद्यस्यास्ति'
ह्मणजे गुरूचे दोष असतील त्यावर पांघरूण घालणारा तो छात्र. गुरू ह्मणजे माणूसच
त्यांत कांहीं कमीपणा असणारच त्याकडे मुलांनीं पाहूं नये. जसें गणित शिकविणाऱ्या
गुरूस इतिहास आला नाहीं तर त्यास नांवें ठेवण्याचें विद्यार्थ्यांचें काम नाहीं. त्यापासून
आपणास शिकणें आहे तें मन लावून शिकावें.

याकरतांच मनूनें ह्मटलें आहे ॥ गुरोर्यत्र परीवादो निंदा वापि प्रवर्तते ॥ कर्णौ तत्र पिधातव्यौ
गन्तव्यं वा ततोऽन्यतः १ ह्मणजे गुरूची थट्टा किंवा निंदा कोणी करीत असल्यास तेथें का-
नावर हात ठेवावे किंवा तेथून उठून दुसरीकडे जावें. विद्यार्थ्यास आणखी एक शब्द
आहे तो 'अन्तेवासी' हा होय. त्याचा अर्थ समीप रहाणारा याकरितां होईल तितका गुरूचा
सहवास करावा. सांप्रतकाळीं हें कांहीं अंशीं कठीण आहे तरी होईल तितकें करावें.
याप्रमाणें पहिल्या अर्थाविषयीं झालें. विषयाचा दुसरा अर्थ ह्मणजे सांप्रतकाळीं आपल्या
लोकांस कोणत्याप्रकारचें ज्ञान संपादिलें पाहिजे. मुलांच्या संबंधानें पहातां हा अर्थ बहुत-
करून विषय नेमणारांच्या मनांत नसेल तथापि कांहीं वक्त्यांनीं हा अर्थ घेऊन भाषण
केलें याकरितां त्याविषयीं थोडें सांगतों. परकी सुधारलेल्या राष्ट्रांच्या संघर्षानें आपणास जी
स्थिति प्राप्त झाली आहे त्या स्थितीस अनुकूळ असें हल्लीं कोणतें शिक्षण असावें हा प्रश्न
हल्लीं मोठा बिकट झाला आहे. त्यावर मोठमोठ्यांचे विचार सुरू आहेत. त्यावर थोड्या
वेळांत विशेष बोलतां येणार नाहीं. कोणी ज्ञान संपादावें. कोणी देशरक्षणार्थ युद्धकला
शिकावी, कोणी लोकांस हवा तो पदार्थ मिळण्याकरतां व्यापार करावा, कोणी देशांतील
सर्व लोकांच्या उपयोगाकरतां कृषिकर्म करावें अशी पूर्वीं आमच्या देशांत व्यवस्था असून
तदनुरूप शिक्षण मिळे. तो प्रकार कालमाहात्म्यानें नाहींसा होऊन ही स्थिति प्राप्त झाली
आहे. तर ज्या देशांस आपण अधिक सुधारलेले ह्मणतों त्यांतल्यासारखें येथें शिक्षण असेल
तरच सुधारणा होईल हें स्पष्ट आहे. कोणत्याप्रकारचें आह्मांस शिक्षण पाहिजे तें थोड्यांत
सांगणें कठीण आहे असें सांगितलेंच आहे तथापि त्याविषयीं थोडें सांगतों. हर्बर्टस्पेन्सर
नामक इग्लंदांतील महाविद्वानानें 'शिक्षण' या नांवाचा जो एक उत्तम ग्रन्थ लिहिला
आहे त्यांत ज्ञानसंपादनाचा क्रम दिला आहे त्याचें तात्पर्य असें.–प्रथम साक्षात् संरक्षण
करण्याचें ज्ञान संपादावें, त्यानंतर परंपरेनें संरक्षण करण्याचें ज्ञान, नंतर संततीचें पालन-
पोषण कसें करावें हें ज्ञान, नंतर जनसमूहांत योग्य वर्तन ठेवण्याचें ज्ञान, नंतर रिकामे वेळीं
चित्तास आल्हाद उत्पन्न करणाऱ्या गोष्टींचें ज्ञान. अशाप्रकारचा क्रम आहे. साक्षात् सं-
रक्षणाचें ज्ञान ह्मणजे, शरीरास व्याधी झाली तर दूर कशी करतां यावी, खाण्यापिण्याच्या
वगैरे संबंधानें कोणत्या रीतीनें वागलें असतां शरीरास अपाय न होईल इत्यादि गोष्टींचा
समावेश होतो. साधारण ट्रामवेची गाडी चालत असतां कोणत्या दिशेस उतरलें पाहिजे



हें ठाऊक नसल्यानें किती अपाय होतात हें सर्वांस माहीत आहे. तर स्वसंरक्षणाकरितां वैद्यक, रसायन, यंत्र इत्यादिकांच्या शास्त्रांची देशांत आवश्यकता आहे हें स्पष्ट आहे. तसेंच परंपरेनें स्वसंरक्षण ह्मणजे त्यास लागणारे अनादि पदार्थ उत्पन्न करतां येण्याची विद्या, हीही असली पाहिजे हें स्पष्टच आहे. मुलें पुढें चांगलीं माणसें निपजतील अशा रीतीनें त्यांची जोपा करतां येण्यास आईबापांच्या आंगीं पुष्कळ ज्ञान पाहिजे तें फारच थोड्यांच्या अंगीं असतें. चवथें, लोकसमुदायाशीं वागण्याचें ह्मणजे नीतिव्यवहार इत्यादिकांचें ज्ञान. पांचवें, काव्य, चित्रकला इत्यादिकांचें ज्ञान असा क्रम असून आमच्या शिक्षणपद्धतींत तो अगदीं उलट झाला आहे. काव्यादिकांचें शिक्षण वरील क्रमांत शेवटलें असून आमच्या शिक्षणपद्धतींत तिला प्रथमस्थान दिलें आहे. शेक्स्पिअर, मिल्तन यांचीं काव्यें शिकून परीक्षेंत पारंगत झालेल्या कलानिधींस आरोग्यरक्षणाचे सामान्य नियम माहीत नाहींत अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. तात्पर्य सांगावयाचें एवढेंच कीं, अर्वाचीन शास्त्रांच्या योगानें पाश्चात्यदेश इतक्या ऊर्जित दशेस आले आहेत, व त्याप्रमाणें आमचा देश संपन्न व्हावा अशी इच्छा आहे तर त्या शास्त्रांचा अभ्यास देशभाषेंत सुरू झाला पाहिजे. हल्लीं भाषा शिकण्याचा जो वाद कित्येकांनीं चालविला आहे तो देखील चमत्कारिक आहे. शेक्स्पिअर सोडून विद्यार्थी ज्ञानेश्वरीचीं पारायणें करूं लागले तरी परिणाम एकच. इंग्रजी पुष्कळ शिकूं नये असें नाहीं. राजकीय कामांत इंग्लिशलोकांशीं संबंध आहे याकरितां पार्लमेन्त सभेंत भाषणकरण्यासारखे निवडक विद्वान् झाले पाहिजेत, तथापि मोठे बुद्धिमान् असे थोडे लोक असले ह्मणजे झालें. सार्वजनिक अर्वाचीन शास्त्रांचें शिक्षण देशभाषेंतच पाहिजे. भाषा ह्मणजे ज्ञानप्राप्तीचें साधन होय; ही दृष्टि ठेवून इंग्रजी शिकलें पाहिजे. सध्या लोक ती साध्यरूपानें शिकतात, ह्मणजे इंग्रजी शुद्ध लिहितां येणें. एवढें शिकण्यांत इतका काळ जातो कीं पुढें कोणतेंही शास्त्र पूर्णपणें शिकण्याची उमेद रहात नाहीं. असें झालें ह्मणजे इंग्रजी लिहितां वाचतां येतें ही विद्वत्ता मानून संतुष्ट होतात. परीक्षेकरतां शेंकडों लोक इंग्रजी ग्रन्थांतून ज्योतिष शिकले असतील, पण परीक्षा झाल्यानंतर पंचांग करण्यापुरतें ज्ञान तरी एकाद्याच्या आंगीं रहात असेल कीं नाहीं याचा संशयच. यावरून असें वाटतें कीं, सांप्रत आपण देशभाषेच्या द्वारें अर्वाचीन शास्त्रांचें ज्ञान संपादावें हेंच आपल्या स्थितीस योग्य होय.

याप्रमाणें तिसऱ्या विषयाविषयीं झालें. दुसऱ्या विषयाच्या वक्त्यांच्या संबंधानें रा० रा० दाजी साहेब खरे यांणीं असें सांगितलें कीं, या समारंभांत कांहीं भाषणांत वक्त्याच्या आंगीं असावा तितका पोक्तपणा नसल्यामुळें भाषणांत थोडा फाजीलपणा झाला, त्यामुळें कोणास वाईट वाटण्याचा संभव आहे याकरितां वक्त्याचें वय निदान अमुक तरी असलें पाहिजे अशासारखा कांहीं नियम असला तर बरें होईल. मला वाटतें अशा नियमाचा उपयोग होणार नाहीं. कारण वक्त्याचें वय इयत्तेपेक्षां वर्ष सहामहिने ज्यास्त असलें ह्मणजे तो फाजील बोलणार नाहीं कशावरून? मोठ्या वयाच्या वक्त्यांनींच फाजीलपणा केल्याचीं उदाहरणें पुणें वगैरे ठिकाणीं पुष्कळ झालीं आहेत. जग गुणदोषमिश्रित आहे. चांगल्या

वरोवर कांहीं वाईट असावयाचेंच. आगगाडी देशांत सुरू झाली झणजे एकादे वेळेस अपघात व्हावयाचाच. याकरतां एकादे वेळेस एकाद्या वक्त्याकडून प्रमाद घडल्यास दुर्लक्ष करण्यापुरती क्षांति श्रोत्यांनीं शिकलीच पाहिजे. चूक झाल्यास गुण कमी लागतील एवढें भय वक्त्यास असलें झणजे पुरे. दुसरी व्यवस्थापक मंडळीस अशी सूचना आहे कीं भाषणांपूर्वी वक्त्यांस दूर वसवावें. कारण सोकट्यांच्या डावांत देखील एकास डाव वाईट पडला झणजे दुसरा कचरतो, तसेंच एकाद्या वक्त्याची श्रोत्यांनीं टाळ्या पिटून काठ्या वाजवून टर उडविली झणजे दुसऱ्याचें धैर्य खचतें. शिवाय एकाच पुस्तकांतून दोघांनीं माहिती मिळविली असल्यास दुसऱ्या बोलणाऱ्यानें पहिल्याचा मजकूर घेतला असें परीक्षकांस किंवा श्रोत्यांस वाटण्याचा संभव आहे, याकरतां त्या शंकेस जागा नसावी हें चांगलें. इतर ठिकाणीं अशी वहिवाट नसली तरी येथील पाहून तेही कदाचित् घेतील, याकरतां व्यवस्थापक मंडळीनें या गोष्टीचा विचार करावा अशी सूचना आहे.

---

## विषय २ रा यावरील पसंत झालेलें पहिलें भाषण
## रा. रा. बळवंत भाऊ नगरकर यांचें.

अध्यक्ष महाराज आणि सभाजनहो, आपल्या या हिंदुस्थान देशांत पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रसार होऊं लागल्यास सुमारें पाउणशेंवर वर्षे होऊन गेलीं. इतक्या कालांत इंग्रजी विद्येचा व भाषाज्ञानाचा आपल्या लोकांत बराच प्रसार झाला आहे. प्रत्येक प्रांतीं इंग्लिश भाषा समजणारे व बोलणारे लोकांची संख्या दिवसानुदिवस वाढत चालली आहे. यामुळें आपले विचार, आपलीं सुखदुःखें एकमेकांस कळविण्याची सांप्रत हिंदुस्थानवासी सर्व प्रकारच्या लोकांस मोठी सोय झाली आहे. अशा प्रकारच्या भाषा ऐक्याच्या योगें मुंबई, मद्रास, बंगाल, गुजराथ, पंजाब वगैरे दूरदूरच्या प्रांतांच्या लोकांच्या एकंदर आचारविचारांतही बरेंच ऐक्य होत आहे. हें ऐक्य सांप्रतच्या आपल्या इंग्रज सरकारच्या एकछत्री अमलाचा व त्यांच्या इंग्रजी भाषेचा परिणाम होय, असें कोणीही कबूल करील. हा परिणाम इष्ट आहे. तो घडून येणें आमच्या राष्ट्राला फार हितकर आहे.

इंग्रजी विद्येच्यायोगें हल्लीं आमच्या लोकसमाजावर वरच्याहून अगदीं निराळा असा एक परिणाम होत आहे. त्याविषयीं आपणांस आज विशेष विचार करावयाचा आहे. पाश्चिमात्य ज्ञानानें भिन्नभिन्न प्रांतांच्या लोकांचें ऐक्य होत आहे खरें; परंतु त्याच्याच बरोबर हिंदुलोकसमाजाचे घटकावयव जीं आपलीं कुटुंबें त्यांच्यावर वरील ज्ञानानें अगदीं विपरीत असा परिणाम होत आहे. ह्या विद्येचा संस्कार सर्व मनुष्यांवर होत नसल्याकारणानें, आणि ज्यांच्यावर होत आहे त्यांच्यावरही तो सारख्या प्रमाणानें होत नसल्यामुळें, प्रत्येक कुटुंबांतील माणसांत रुचिवैचित्र्य उत्पन्न होऊन परस्परांमध्यें कलह सुरू होतात. बहुतेक कुटुंबांतील तरुण मनुष्यांवर—आणि त्यांतून विशेषत: तरुण पुरुष जातीवर—ह्या पाश्चिमात्य ज्ञानाचा विशेष संस्कार होत असल्यामुळें त्यांच्यांत व इतर वृद्ध, वडील माणसांत मोठाच भिन्नभाव उत्पन्न होतो. हा भिन्नभाव आमच्या कुटुंबसुखास अत्यंत घातक होतो.



पाश्चिमात्य विद्येच्यायोगें होणारे हे दोन निरनिराळे व परस्परविरुद्ध परिणाम आपण लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत.

पाश्चिमात्य ज्ञान, हें एकाद्या जालीम रसायनासारखें आहे. एखाद्या प्रखर रसायनाच्यायोगें वातावरणांतील दूरदूरच्या द्रव्यांचा संयोग होतो; परंतु तेंच एकाद्या सूक्ष्म पदार्थावर टाकिलें असतां त्या पदार्थांच्या परमाणूंचें पृथक्करण होऊन ते एकमेकांपासून तटातट तुटून पडतात. त्याचप्रमाणें हें पाश्चिमात्य ज्ञानरसायन आमच्या लोकसमाजावर येऊन पडतांच त्याच्यायोगें भिन्नभिन्न स्थलींच्या लहानसान समाजांचें संयोगीकरण व दरएक कुटुंबांतील माणसांचें विभागीकरण, असे परस्परांशीं विपरीत परिणाम होत आहेत. ( टाळी ).

यांपैकीं दुसरा परिणाम, विभागीकरण, याविषयीं आज आपणास विचार कर्तव्य आहे. हें पृथक्करण अथवा विभागीकरण, याच्यायोगें प्रत्येक कुटुंबांत—व त्याच पर्यायानें एकंदर राष्ट्रांत—जुने लोक व नवे लोक असे दोन विभाग झाले आहेत. या उभयपक्षांच्या इच्छा, रुचि, कल्पना, आचार, विचार, वगैरे सर्वच कांहीं निराळें असल्यामुळें दोघांचें एकमेकांशीं बनत नाहीं. हा बेबनाव बाहेर समाजांत तितका अनुभवास येत नाहीं; तथापि कुटुंबामध्यें या उभयवर्गांचें संघट्टन विशेष निकट असतें, झणून हा भिन्नभाव कुटुंबांतील माणसांस फारच दुःखद होतो. तो न होण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं उभयपक्षांचें ऐक्य होऊन सर्वांनीं सलुख्यानें वागावें. ( टाळी ). जुने लोक व नवे लोक यांचें ऐक्य होऊन दोघांनींही कुटुंबामध्यें गोडीगुलाबीनें राहावें असें चटदिशीं चार शब्दांनीं सांगतां आलें तथापि हें ऐक्य करण्यास कोणत्या उपायांची योजना करावी हें नुसतें सांगणें देखील परम कठिण आहे—मग त्या उपायांचें अवलंबन करून, त्यापासून आपली कार्यसिद्धि करून घेऊन, नित्याच्या व्यवहारांमध्यें तदनुरूप वागणें ही गोष्ट फारच दूरची आहे ! ती झणजे सर्वांस साधेलच असें नाहीं.

तथापि, महाराज, हें ऐक्य करण्याकरितां जुन्या व नव्या लोकांनीं एकमेकांशीं कोणत्या रीतीनें वागावें, हें सांगण्याचें काम मी पत्करिलें आहे. तें यथाशक्ति बजाविलें पाहिजे.

जुने लोक नव्या लोकांपेक्षां वडील आहेत, त्यांचा समाज तूर्त अफाट पसरलेला आहे. एतदर्थ त्यांच्याच विषयीं प्रथम विचार करूं. त्यांनीं कोणत्या धोरणानें वागावें याविषयीं पहिल्यानें विचार करूं. जुने लोक वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध आहेत, ते समजुतदार आहेत, त्यांना अनुभव मोठा व दीर्घकालचा आहे. यास्तव त्यांस फारसा बुद्धिवाद करण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांस तीन चार गोष्टी विनयपूर्वक सूचविल्या झणजे बस्स आहे. झणून त्यांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारख्या गोष्टींचा विचार करून त्यांच्याविषयींचा भाग प्रथम आटोपून घेऊं. झणजे वडिलांस मान दिल्याचेंही श्रेय प्राप्त होईल. ( मोठी टाळी ).

( **अ** ).—सांप्रतच्या काळास **कलियुग** अशी संज्ञा देण्याचा प्रघात आपणांमध्यें आहे. परंतु ह्या युगास **कलियुग** झणण्यापेक्षां **विचारयुग** असें झटलें असतां अधिक शोभेल असें मला वाटतें. ( टाळी ) कारण, हल्लींच्या काळीं मनुष्याचें विचारसामर्थ्य जसें उदयास येत आहे तसें पूर्वीच्या कोणत्याही काळीं आलें नसेल. शिवाय प्रत्येक राष्ट्रांत विचाराचें भरपूर

पीक येऊन तें तेथल्यातेथेंच राहात नाहीं. ह्या युगाचा असा कांहीं महिमा आहे कीं, निरनिराळ्या देशांमध्यें कापूस, ताग, धान्य, धातु, कपडा लत्ता, वगैरे व्यापाराच्या जिनसा ह्यांची व्यापाराच्यासंबंधानें जशी अदलाबदल होत आहे त्याचप्रमाणें, किंबहुना त्याजहूनही अधिक प्रमाणानें निरनिराळ्या देशांतील आचारविचारांतही मोठी प्रचंड अदलाबदल चालली आहे. यंत्रशास्त्रें उदयास येऊन आगगाड्या, तारायंत्रें, टपालव्यवस्था, दूरध्वनियंत्रें यांच्या-साहाय्यांनीं दूरदूरच्या देशच्या लोकांचें दळणवळण वाढून परस्परांचे आचारविचार परस्परांस समजूं लागले आहेत. अर्थात्, आपले अमुक आचारविचार अयोग्य आहेत, तर ते टाकून त्यांच्या ऐवजीं दुसऱ्यांचे ग्रहण करण्याची इच्छा अशा प्रसंगीं उभय राष्ट्रांस होणें हें साहजिकच आहे. कोणत्याही राष्ट्रांची सुखसंपत्ती वाढून त्यांस ऊर्जित अवस्था येण्यास त्यांमधील व्यापार अप्रतिबंध ( Free Trade ) असला पाहिजे, हें अर्थशास्त्राचें तत्त्व जसें या एकुणिसाव्या शतकांत सर्वमान्य होऊन बसलें आहे, तसेंच त्या उभयराष्ट्रांतील विचारधन वाढून त्यांचें कल्याण होण्यास त्यांच्यामधील विचारांचाही व्यापार अप्रतिबंध असला पाहिजे, हेंही एक सामाजिकशास्त्राचें प्रमेय विद्वन्मान्य झालें आहे. परदेशचा माल स्वदेशीं आणल्याशिवाय व स्वदेशचा परदेशीं पाठविल्याशिवाय जशी देशांतील संपत्ति वाढत नाहीं, तद्वतच आपल्या चालीरीतीची योग्यायोग्यता पाहून परक्यांच्या चालीरीति ग्रहण केल्याशिवाय या विचाराच्या युगांत आपला टिकाव लागणार नाहीं. व्यापारांत जसा अप्रतिबंध व्यवहार आहे तसाच, चांगले विचार ग्रहण करण्याच्या किंवा वाईट विचार टाकण्याच्या कामींही, अप्रतिबंध प्रकार असला पाहिजे.

पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें अधिक उण्या मानानें पूर्वींपासून असेंच करीत आलीं आहेत. ज्यांनीं या नियमाकडे दुर्लक्ष केलें त्यांचा देश रसातळास गेला, व ज्यांनीं त्याचें अवलंबन केलें त्यांचा देश उदयास आला. या दोन्हीही गोष्टींचीं उदाहरणें इतिहासांतरीं आपणांस पाहिजे तितकीं सांपडतील. हा आपला हिंदुस्थान देश यानें इराणी, अफगाणी, मुसलमान, मोंगल, पोर्तुगीज, फ्रेंच, आदिकरून जंगली, धर्मवेड्या, काबेबाज लोकांच्या छलापुढें आजपर्यंत टिकाव धरून जें आपलें स्वत्व राखिलें आहे तें तरी याच इतिहासतत्त्वाच्या अवलंबनानें. दुसरें कांहीं नाहीं ( टाळी ). “ वारा येईल तशी पाठ द्यावी. ” असें नितीच्या व्यवहारशास्त्राचें एक वचन आहे त्याचा तरी सारांश वरच्यासारखाच आहे. तेव्हां सांप्रत आमच्या लोकांच्या विचारांत व आचारांत जो कांहीं फरक पडत चालला आहे तो म्हणजे मोठा अपूर्व आहे, त्याला स्वदेशाच्या इतिहासांत उपमाच नाहीं, असें बिलकूल नाहीं. ही एक गोष्ट जुन्या लोकांनीं प्रथम लक्ष्यांत बाळगावी.

**( आ. )**—मनुष्यास त्याच्या क्रियेवरून आपण दोष देतों तो त्याच्या बऱ्या वाईट हेतूवरून देतों. कोणाचा प्राण घेण्याच्या हेतूनें दरोडेखोरानें कोणावर शस्त्रप्रहार केल्यास त्या चोरास मोठा अधमाधम पातकी समजून त्यास आपण देहांत शिक्षा करितों. परंतु तोच आपल्या कसबामध्यें हुषार असा एकादा शस्त्रवैद्य आपल्या प्रखर नस्तरानें रोग्याच्या अत्यंत नाजूक अवयवाचा जरी फाड करूं लागला तरी त्यास मोठा परोपकारी समजून त्याचे



महदुपकार मानितों ! आपल्या समजुतींत हा जो एवढा मोठा विपर्यास होतो तो क्रियेवरून नव्हे, तर तिच्या कर्त्याच्या हेतूवरून होतो, हें उघड आहे. नव्या लोकांच्या आचरणांत सांप्रत जो कांहीं फरक पडत चालला आहे त्याचा मूळ हेतु निंद्य नाहीं स्तुत्यच आहे. नवे लोक ज्या कांहीं आपल्या चाली रीति बदलताहेत त्या बदलण्यांत त्यांचा हेतु जुन्या लोकांस उगाच दुखवावें, त्यांचा पाणउतारा करावा, किंवा त्यांस कोणत्यातरी रीतीनें व्यर्थ दुःख द्यावें, असा मुळींच नाहीं. वृद्ध मातापितरें, आपले साळेभोळे सखेसोयरे व आपले भाविक इष्ट मित्र यांस आपल्या अचरट आचरणानें परम दुस्सह दुःख देण्याकरितांच परकी लोकांच्या हेंदऱ्या चाली रीतींचें अवलंबन करणारे अधमाधम नव्या लोकांच्या पक्षांत क्वचित् असतील —नसतील असें माझ्यानें म्हणवत नाहीं. ( टाळी ). परंतु ईशकृपेनें त्यांची संख्या मोठी नाहीं. नवे लोक नव्या चाली रीतींचें अनुकरण करताहेत तें आपलें कर्तव्य असें समजून सद्धेतुपूर्वक करितात. त्यापासून जरी कोणाचीं मनें दुखलीं, तरी त्याचा दोष त्यांचे माथीं ठेवणें रास्त नाहीं. मनुष्य आपल्या समजुतीप्रमाणें वागत असतांही जर त्याच्या वागण्यापासून कोणास विषाद वाटला तर त्याचा दोष त्याजकडे नाहीं. तेव्हां, जुन्या लोकांनीं नव्या लोकांस व्यर्थ दोष देण्याचें सोडून देऊन ते आपल्या समजुतीप्रमाणें वागताहेत तें योग्यच आहे, असें मानून स्वस्थ असावें. अशानें कलहाचें कारण बरेंच मिटेल. जुन्या लोकांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखी ही दुसरी गोष्ट होय.

**( इ. )**—विचार करून पाहतां जगामध्यें नवें म्हणून कांहींच नाहीं. सर्व जुनेंच असतें. मात्र त्याचें बाह्यस्वरूप बदललेलें असतें. नव्या लोकांच्या नूतन चाली व आधुनिक सुधारणा ह्या सर्व गोष्टी पाहून जुन्या लोकांस तिटकारा येतो. त्यांची तळची आग मस्तकीं जाते. परंतु तेच अमळ विचार करून पाहतील तर त्यांची खात्री होईल कीं आजच्या काळीं “ नवें ” “ नवें ” म्हणून आधुनिक सुधारक जी व्यर्थ कोल्हेकुई करीत आहेत, व ती ऐकून आपण जी धास्ती घेत आहों त्यांपैकीं एकही रास्त नाहीं. मोठेपणीं लग्नें करणें, वधूवरांनीं स्वेच्छेनें पतिपत्नी पसंत करणें, विधवांनीं पुनर्विवाह करणें, तसेंच स्त्रियांनीं उपयुक्त विद्याध्ययन करणें वगैरे जीं कांहीं आधुनिक सुधारणासागरांतील मौक्तिकें आहेत तीं सर्व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें पुरातनकालीं आमच्या या पवित्र आर्यावर्तांत उपलब्ध होतीं. परंतु पुढें कालगतीनें परकी लोकांनीं तीं आम्हापासून हिरावून घेतलीं. त्यास शेंकडों वर्षें झालीं. सांप्रत आम्हांस त्यांचें दर्शन होत आहे; परंतु परकी देशच्या शीतोष्ण हवेनें त्यांचा रंग बदलून जाऊन त्यांचें रूपांतर झाल्याकारणानें त्यांची व आमची बिलकूल ओळख पटत नाहीं. सारांश, चांगल्या चांगल्या म्हणून ज्या कांहीं चालीरीतींचें परकी लोकांपासून आम्ही अनुकरण करूं इच्छितों त्या सर्व प्राचीनकालीं आमच्या देशांत होत्या. तेव्हां त्यांचें जर आम्ही हल्लीं अवलंबन करूं लागलों तर त्यांत वावगें कांहींच नाहीं. गुराखी साऱ्या दिवसभर आणि साऱ्या रात्रभर गाईस चारा वैरण घालून तिचें संरक्षण करितो आणि आपल्या श्रमाचा व चारावैरणीचा मोबदला म्हणून दुसरे दिवशीं तिच्या स्तनांतून दूध काढितो. त्याचप्रमाणें मनु, व्यास, वाल्मिकी, कणाद, पाणिनी यांच्यासारख्या महा-

पीक येऊन तें तेथल्यातेथेंच राहात नाहीं. ह्या युगाचा असा कांहीं महिमा आहे कीं, निरनिराळ्या देशांमध्यें कापूस, ताग, धान्य, धातु, कपडा लत्ता, वगैरे व्यापाराच्या जिनसा ह्यांची व्यापाराच्यासंबंधानें जशी अदलाबदल होत आहे त्याचप्रमाणें, किंबहुना त्याजहूनही अधिक प्रमाणानें निरनिराळ्या देशांतील आचारविचारांतही मोठी प्रचंड अदलाबदल चालली आहे. यंत्रशास्त्रें उदयास येऊन आगगाड्या, तारायंत्रें, टपालव्यवस्था, दूरध्वनियंत्रें यांच्या-साहाय्यांनीं दूरदूरच्या देशच्या लोकांचें, दळणवळण वाढून परस्परांचे आचारविचार परस्परांस समजूं लागले आहेत. अर्थात्, आपले अमुक आचारविचार अयोग्य आहेत, तर ते टाकून त्यांच्या ऐवजीं दुसऱ्यांचे ग्रहण करण्याची इच्छा अशा प्रसंगीं उभय राष्ट्रांस होणें हें साहजिकच आहे. कोणत्याही राष्ट्रांची सुखसंपत्ती वाढून त्यांस ऊर्जित अवस्था येण्यास त्यांमधील व्यापार अप्रतिबंध ( Free Trade ) असला पाहिजे, हें अर्थशास्त्राचें तत्त्व जसें या एकुणिसाव्या शतकांत सर्वमान्य होऊन बसलें आहे, तसेंच त्या उभयराष्ट्रांतील विचारधन वाढून त्यांचें कल्याण होण्यास त्यांच्यामधील विचारांचाही व्यापार अप्रतिबंध असला पाहिजे, हेंही एक सामाजिकशास्त्राचें प्रमेय विद्वन्मान्य झालें आहे. परदेशचा माल स्वदेशीं आणल्याशिवाय व स्वदेशचा परदेशीं पाठविल्याशिवाय जशी देशांतील संपत्ति वाढत नाहीं, तद्वतच आपल्या चालीरीतींची योग्यायोग्यता पाहून परक्यांच्या चालीरीति ग्रहण केल्याशिवाय या विचाराच्या युगांत आपला टिकाव लागणार नाहीं. व्यापारांत जसा अप्रतिबंध व्यवहार आहे तसाच, चांगले विचार ग्रहण करण्याच्या किंवा वाईट विचार टाकण्याच्या कामींही, अप्रतिबंध प्रकार असला पाहिजे.

पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें अधिक उण्या मानानें पूर्वींपासून असेंच करीत आलीं आहेत. ज्यांनीं या नियमाकडे दुर्लक्ष केलें त्यांचा देश रसातळास गेला, व ज्यांनीं त्याचें अवलंबन केलें त्यांचा देश उदयास आला. या दोन्हीही गोष्टींचीं उदाहरणें इतिहासांतरीं आपणांस पाहिजे तितकीं सांपडतील. हा आपला हिंदुस्थान देश यानें इराणी, आफगाणी, मुसलमान, मोंगल, पोर्तुगीज, फ्रेंच, आदिकरून जंगली, धर्मवेड्या, कावेबाज लोकांच्या छलापुढें आजपर्यंत टिकाव धरून जें आपलें स्वत्व राखिलें आहे तें तरी याच इतिहासतत्त्वाच्या अवलंबनानें. दुसरें कांहीं नाहीं ( टाळी ). "वारा येईल तशी पाठ द्यावी." असें निसाच्या व्यवहारशास्त्राचें एक वचन आहे त्याचा तरी सारांश वरच्यासारखाच आहे. तेव्हां सांप्रत आमच्या लोकांच्या विचारांत व आचारांत जो कांहीं फरक पडत चालला आहे तो ह्मणजे मोठा अपूर्व आहे, त्याला स्वदेशाच्या इतिहासांत उपमाच नाहीं, असें बिलकूल नाहीं. ही एक गोष्ट जुन्या लोकांनीं प्रथम लक्ष्यांत वाळगावी.

**( आ. )**—मनुष्यास त्याच्या क्रियेवरून आपण दोष देतों तो त्याच्या बऱ्या वाईट हेतूवरून देतों. कोणाचा प्राण घेण्याच्या हेतूनें दरोडेखोरानें कोणावर शस्त्रप्रहार केल्यास त्या चोरास मोठा अधमाधम पातकी समजून त्यास आपण देहांत शिक्षा करितों. परंतु तोच आपल्या कसबामध्यें हुषार असा एकादा शस्त्रवैद्य आपल्या प्रखर नस्तरानें रोग्याच्या अत्यंत नाजूक अवयवाचा जरी फाड करूं लागला तरी त्यास मोठा परोपकारी समजून त्याचे



महदुपकार मानितों! आपल्या समजुतींत हा जो एवढा मोठा विपर्यास होतो तो क्रियेवरून नव्हे, तर तिच्या कर्त्याच्या हेतूवरून होतो, हें उघड आहे. नव्या लोकांच्या आचरणांत सांप्रत जो कांहीं फरक पडत चालला आहे त्याचा मूळ हेतु निंद्य नाहीं स्तुत्यच आहे. नवे लोक ज्या कांहीं आपल्या चाली रीति बदलताहेत त्या बदलण्यांत त्यांचा हेतु जुन्या लोकांस उगाच दुखवावें, त्यांचा पाणउतारा करावा, किंवा त्यांस कोणत्यातरी रीतीनें व्यर्थ दुःख द्यावें, असा मुळींच नाहीं. वृद्ध मातापितरें, आपले साळेभोळे सखेसोयरे व आपले भाविक इष्ट मित्र यांस आपल्या अचरट आचरणानें परम दुस्सह दुःख देण्याकरितांच परकी लोकांच्या हेंदऱ्या चाली रीतींचें अवलंबन करणारे अधमाधम नव्या लोकांच्या पक्षांत क्वचित् असतील —नसतील असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. ( टाळी ). परंतु ईशकृपेनें त्यांची संख्या मोठी नाहीं. नवे लोक नव्या चाली रीतींचें अनुकरण करताहेत तें आपलें कर्तव्य असें समजून सद्धेतुपूर्वक करितात. त्यापासून जरी कोणाचीं मनें दुखलीं, तरी त्याचा दोष त्यांचे माथीं ठेवणें रास्त नाहीं. मनुष्य आपल्या समजुतीप्रमाणें वागत असतांही जर त्याच्या वागण्यापासून कोणास विषाद वाटला तर त्याचा दोष त्याजकडे नाहीं. तेव्हां, जुन्या लोकांनीं नव्या लोकांस व्यर्थ दोष देण्याचें सोडून देऊन ते आपल्या समजुतीप्रमाणें वागताहेत तें योग्यच आहे, असें मानून स्वस्थ असावें. अशानें कलहाचें कारण बरेंच मिटेल. जुन्या लोकांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखी ही दुसरी गोष्ट होय.

**( इ. )**--विचार करून पाहतां जगामध्यें नवें ह्मणून कांहींच नाहीं. सर्व जुनेंच असतें. मात्र त्याचें बाह्यस्वरूप बदललेलें असतें. नव्या लोकांच्या नूतन चाली व आधुनिक सुधारणा ह्या सर्व गोष्टी पाहून जुन्या लोकांस तिटकारा येतो. त्यांची तळची आग मस्तकीं जाते. परंतु तेच अमळ विचार करून पाहतील तर त्यांची खात्री होईल कीं आजच्या काळीं "नवें" "नवें" ह्मणून आधुनिक सुधारक जी व्यर्थ कोल्हेकुई करीत आहेत, व ती ऐकून आपण जी धास्ती घेत आहों त्यांपैकीं एकही रास्त नाहीं. मोठेपणीं लग्नें करणें, वधूवरांनीं स्वेच्छेनें पतिपत्नी पसंत करणें, विधवांनीं पुनर्विवाह करणें, तसेंच स्त्रियांनीं उपयुक्त विद्याध्ययन करणें वगैरे जीं कांहीं आधुनिक सुधारणासागरांतील मौक्तिकें आहेत तीं सर्व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें पुरातनकालीं आमच्या या पवित्र आर्यावर्तांत उपलब्ध होतीं. परंतु पुढें कालगतीनें परकी लोकांनीं तीं आह्मापासून हिरावून घेतलीं. त्यास शेंकडों वर्षें झालीं. सांप्रत आह्मांस त्यांचें दर्शन होत आहे; परंतु परकी देशच्या शीतोष्ण हवेनें त्यांचा रंग बदलून जाऊन त्यांचें रूपांतर झाल्याकारणानें त्यांची व आमची बिलकूल ओळख पटत नाहीं. सारांश, चांगल्या चांगल्या ह्मणून ज्या कांहीं चालीरीतींचें परकी लोकांपासून आह्मीं अनुकरण करूं इच्छितों त्या सर्व प्राचीनकालीं आमच्या देशांत होत्या. तेव्हां त्यांचें जर आह्मीं हल्लीं अवलंबन करूं लागलों तर त्यांत वावगें कांहींच नाहीं. गुराखी साऱ्या दिवसभर आणि साऱ्या रात्रभर गाईस चारा वैरण घालून तिचें संरक्षण करितो आणि आपल्या श्रमाचा व चारावैरणीचा मोबदला ह्मणून दुसरे दिवशीं तिच्या स्तनांतून दूध काढितो. त्याचप्रमाणें मनु, व्यास, वाल्मिकी, कणाद, पाणिनी यांच्यासारख्या महा-

त्यांच्या बुद्धिप्रभावानें जीं विचारभांडाररूपी विस्तृत शेतें व कुरणें या भारतवर्षांत उदयास आलीं त्यांमध्यें पश्चिमेकडील भूमिकारूप गायींनीं चौरवृत्तीनें कैक शतकेंपर्यंत यथेच्छ परिभ्रमण करून आपला देह पोशिला. अशा रीतीनें आमच्या खाद्यावर पुंग झालेल्या गायी ईश्वरीन्यायानें आज आमच्या हातीं लागल्या आणि त्यांचें दूध आह्मीं ग्रहण केलें तर त्यांत काय अन्याय झाला ? ( मोठी टाळी—दीर्घकालपर्यंत ). महाराज, नव्या चाली रीती उदयास आणून दाखविण्याचें महाभाग्य पश्चिमखंडाचें नाहीं ! अलीकडील सुधारणा, श्वेतद्वीपांतून आली आहे, असें ह्मणून जुने लोक पश्चिमद्वीपास नस्ती थोरवी देत आहेत—अर्थात त्याचमानानें आपल्या देशाचें वाजवी महत्त्व नष्ट केल्याचें महत्पाप पदरीं बांधून घेत आहेत. ( मोठी टाळी. ) जुन्या लोकांनीं लक्ष्यांत राखण्यांसारखी ही तिसरी गोष्ट होय.

( ई. )—नदीच्या प्रवाहास बांध घालून आडवूं ह्मटलें तर कालत्रयींही व्हावयाचें नाहीं. प्रवाह विस्तृत होऊन आपल्या वेगानें कांठावरच्या शेतामळ्यांची नासाडी करूं लागल्यास पाट काढून त्याचें पाणी अन्यकार्यास लाविल्यास कदाचित् त्याजपासून हित होईल परंतु वेगवान नदीच्या प्रवाहास प्रतिबंध करूं ह्मटल्यास आपणास यश येणार नाहीं. तद्वत् राष्ट्रीय बुद्धीस एका एका कालीं जी कांहीं दिशा प्राप्त होते ती एकाएकीं बदलत नाहीं. ती एकदम बदलूं पाहणें हेंही इष्ट नाहीं. नदीस आलेल्या भरतीच्या पाण्याचा पूर अल्पकालपर्यंत राहून जसा आपोआप ओसरून जातो, आणि नंतर नदीचा प्रवाह शांत स्थीर वाहतो, त्याचप्रमाणें आमच्या देशांतील तरुण मंडळीस निवळ नव्या आचारविचारांचें भरतें आलेंसें दिसत आहे, तें आपोआप नाहींसें होईल. पदार्थ एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत जातांना त्यास जी मध्यमावस्था प्राप्त होते ती फार विलक्षण असते खरी. तथापि ती फारवेळ राहात नाहीं. तशीच तूर्त हिंदुलोकसमाजास प्राप्त झालेली अस्वस्थतेची मध्यमावस्था हीही दीर्घ कालपर्यंत टिकणार नाहीं. ती लवकरच जाऊन दुसरी श्रेष्ठ अवस्था त्यास प्राप्त होणार. तेव्हां जुन्या लोकांनीं व्यर्थ दुःखी होण्याचें बिलकुल प्रयोजन नाहीं. सकल उचिताचा दाता जो परमेश्वर त्यावर आपला सर्व भरंवसा ठेवून, "**तुका** ह्मणे उगी रहावें, जें जें होइल तें तें पहावें" ह्या संतशिरोमणीच्या उक्तीची आठवण राखावी. ( टाळी ) जुन्या लोकांनीं लक्ष्यांत ठेवण्याजोगी ही चवथी गोष्ट होय.

एथपर्यंत जुन्या लोकांच्या संबंधानें जो कांहीं विचार कर्तव्य होता तो केला. पूर्वीं सांगितलेल्या चार गोष्टी नीटपणें लक्ष्यांत वागवून ते चालतील तर कुटुंबामध्यें किंवा समाजांत कलहाला ते कदापि कारण होणार नाहींत.

आतां नव्या लोकांच्या संबंधानें विचार करूं. नव्या लोकांचा समाज आजमितीस ह्मणण्यासारखा मोठा नाहीं, तरी दिवसानुदिवस तो वाढत आहे. थोड्याच काळांत त्यास मोठें विशाल स्वरूप येईल. ह्मणून त्याची उपेक्षा करितां कामा नये. जुन्या लोकांपेक्षां नव्या लोकांत उत्साह अधिक आहे. परंतु त्या मानानें अनुभव कमी आहे. असें असणें साहजिक आहे. ह्मणून नवीन लोकांस अद्याप पुष्कळ नवीन गोष्टी शिकावयाच्या आहेत—पुष्कळांचा नीट लक्ष्यपूर्वक विचार करावयाचा आहे.



आपल्या नित्याच्या व्यवहारांत "एका हातानें कधींही टाळी वाजत नाहीं" अशी एक ह्मण आहे. ती खरी आहे. टाळी वाजण्यास दोन हातांची संमति असली पाहिजे यांत संशय नाहीं; तथापि टाळी वाजतांना आपला उजवा हात डाव्या हातावर जाऊन आदळतो. डावा उजव्यावर आदळत नाहीं—याचाही अनुभव सर्वांस असेलच. त्याचप्रमाणें, दोन पक्ष असल्यावांचून कलह होत नाहीं, हें अगदीं सत्य आहे, तरी प्रत्येक कलहाच्या कामीं दोहोंपैकीं कोणता तरी एक पक्ष विशेष रीतीनें कारणीभूत होतो. या नियमाअन्वयें, जुने लोक आणि नवे लोक यांतून कुटुंबकलहास विशेषरीतीनें कोण कारणीभूत होतात याचा विचार करूं गेल्यास आपली अशी स्पष्ट खात्री होते कीं, जुन्यापेक्षां नवे लोक तंट्याला अधिक कारण असतात. दोषाचा वराच अंश नव्या लोकांच्या पदरीं येतो (टाळी). ह्मणून तंट्याचें मूळ खणून काढण्याचे कामीं आमच्या नवीन मंडळीनें विशेष खबरदारी ठेविली पाहिजे. त्यांनीं मनावर घेतल्यास पुष्कळ तंटा मिटण्यासारखा आहे.

१.—नव्या लोकांच्या संबंधानें कलह मिटविण्याचे उपायांचा विचार करण्याचे अगोदर आपण एक गोष्ट लक्ष्यांत धरिली पाहिजे, ती ही कीं हिंदु कुटुंबांत तंटा भांडण होण्याचा संभव अधिक असतो. आपलें कुटुंब युरोपिअन लोकांच्या कुटुंबाप्रमाणें नवरा बायको व एक दोन अपत्यें मिळून झालेलें नसतें.—त्यांत भाऊ-वहिणी, जावा-ननदा, चुलते-चुलत्या वगैरे दूरचीं व जवळचीं पुष्कळ नातेवाईक माणसें असतात. कित्येक कुटुंबांत ४०—५० इतकीं देखील मनुष्यें असतात. ज्या ठिकाणीं भिन्नभिन्न प्रकृतीचीं इतकीं माणसें साऱ्या जन्मभर एकत्र राहावयाचीं त्या ठिकाणीं तंटे झाले व कलह माजले तर त्यांत कांहीं नवल नाहीं. हा दोष कुटुंबांतल्या माणसांचा फारसा नाहीं. आमच्या कुटुंबव्यवस्थेचाच हा दोष असें ह्मटलें पाहिजे. आह्मांमध्यें अविभक्त कुटुंबाची चाल असल्यामुळें सर्वप्रकारचीं माणसें एकत्र राहातात आणि ह्यामुळें कलह होतात. आह्मांमधील भावाभावांचे तंटे सर्व प्रसिद्धच आहेत. एका कुटुंबांतल्या माणसांत दृढ बंधुप्रेम असावें हें रास्त आहे. परंतु पुष्कळ नातलग एकत्र राहिल्यास "मूर्ति तितक्या प्रकृति" असें होऊन एकाचें दुसऱ्यांशीं बनत नाहीं, हें नित्य आपल्या अनुभवास येत असतें. आपणामधील "भाऊबंदी" किती दारुण असते हें कोणासही सांगण्याचें प्रयोजन नाहीं. माझें ह्मणण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, अविभक्त कुटुंबव्यवस्थेमुळें आमच्या कुटुंबांमध्यें फार पुरातन कालापासून कलह होत आले आहेत. ते ह्मणजे पाश्चिमात्यविद्येनेंच आज उत्पन्न झाले, असें नाहीं—तिच्या योगानें ते विशेष प्रबल झाले असें ह्मटलें असतां शोभेल.

पूर्वीच्या कालीं, ह्मणजे कुटुंबांतील माणसांत हल्लींच्या सारखा मतांचा भिन्नभाव किंवा आचारविचारांचा विपर्यास वगैरे कांहींएक नव्हतें. अशावेळीं देखील जर कुटुंबांतील माणसांत ऐक्य नव्हतें, भाऊभाऊ एकमेकांच्या नरडीचा घोट घेऊं पहात होते व त्यांच्या स्त्रियांत महिन्यांतून पंधरा दिवस अबोला असे; तर सांप्रत ह्मणजे जेव्हां परस्पर सर्वांशीं विरुद्ध अशा प्रकारचे दोन प्रबल पक्ष प्रत्येक कुटुंबांत निर्माण झाले आहेत अशा कालीं कुटुंबांत ऐक्य कसें राहावें ? धर्म, व्यवहार, नीति, नित्याचार यांच्या संबंधानें पूर्ण ऐक्य होतें अशा

कालीं देखील जी अविभक्तकुटुंबव्यवस्था आह्मांस फारशी हितकर झाली नाहीं—तीच, सांप्रत आमच्या राष्ट्रांत आमच्या समाजांत, आमच्या कुटुंबांत—फार काय आमच्या आह्मांत पूर्ण दुही माजून गेली आहे अशा कालीं आमच्या कुटुंबसुखास घातक झाल्यावांचून कशी राहील? कदापि राहाणार नाहीं. ह्मणून आपली पूर्वीची कुटुंबव्यवस्था बदलून विभक्त राहण्याचा परिपाठ घातला पाहिजे. मुलगा जाणता झाला, त्याचा विद्याभ्यास संपून त्यानें विवाह केला कीं, त्यानें स्वतंत्र संसार थाटून आईबापांपासून व भाऊबंदांपासून निराळें राहावें. हल्लींच्या कालीं अशा प्रकारें विभक्त राहिल्याच्यायोगें देशाचें व स्वतःचें अनंत कल्याण होणारें आहे. हल्लीं एकत्र राहण्याची चाल असल्यामुळें कुटुंबांत कोणीतरी एकजण उद्योग करणारा असतो. बाकीचे त्याच्या जिवावर उड्या मारणारे असतात. हा विषय स्वतंत्र व मोठ्या महत्वाचा आहे. आजच्या विषयाच्या संबंधानें या मुद्याविषयीं एवढें सांगणें बस्स आहे कीं, आईबापांच्या संमतीनें, ह्मणजे त्यांच्याशीं भांडून झगडून नव्हे तर, त्यांच्याच परवानगीनें, विभक्त राहिल्यास देशामध्यें उद्योग, संपत्ति, स्वतंत्रता इत्यादि वाढून कुटुंबकलहाचीं कारणें बऱ्याच अंशीं टळतील यांत संशय नाहीं. ही चाल हल्लीं गुजराथ प्रांतीं कित्येक व्यापाऱ्यांत चालू आहे. मुलगा मोठा झाला कीं, बाप त्याला सामर्थ्यानुरूप हजार पांचशांची पुंजी देऊन स्वतंत्र व्यापार करण्यास सांगतो व तोही त्याप्रमाणें करितो. अल्प कालांतच मुलगा मोठा व्यापारी होऊन श्रीमंत "शेठ" बनून थाटानें संसार करूं लागतो. जवळच्या नातेवाईकांवर किंवा दूरच्या भाऊबंदांवर कोणत्याही प्रकारें तो अवलंबून नसल्यामुळें त्याचें कोणाशीं वांकडें येत नाहीं, अर्थात त्याच्या कुटुंबांत कलहाचा तितका पाय शिरकत नाहीं.

हाच प्रकार आपले इकडे चालू करण्यास पुष्कळ अडचणी आहेत हें खरें आहे. तथापि ऐक्याच्या उपायांचा विचार करीत असतां विभक्तकुटुंबव्यवस्था माझ्या मनांत प्रथम आली ह्मणून तिचा मी प्रथम उद्गार केला. कलहाचा उपशम करून ऐक्य करण्याचे **साम, दाम, दंड भेद** असे चार उपाय सांगण्याची परंपरा आहे. त्यांपैकीं दुसरा आणि तिसरा ह्मणजे **दाम** आणि **दंड** ह्यांचा तूर्त आपणांस बिलकूल उपयोग नाहीं. बाकी उरले दोन. त्यांपैकीं शेवटला जो **भेद** तो मीं आपणांस प्रथम सांगितला. तो सर्वांसच सारखा पटेल असें नाहीं.

२.—राष्ट्रांमध्यें मोठमोठ्या लढाया होण्यास पुष्कळ प्रसंगीं स्त्रिया कारणीभूत झाल्या आहेत. पाहिजे असल्यास अगदीं पुरातन पौराणीक कालापासून पहा. रामरावणांच्या तुमुल युद्धास मूळ कारण जनकाची कन्या सती सीता. कौरव पांडवांचा जो घोर संग्राम झाला त्याला मूळ कारण पांडवांची साध्वी स्त्री द्रौपदी. तसेंच, दुसऱ्या हेनरीच्या राज्यांत ऐर्लंद देशांत इंग्लिशांचा जो प्रथम पाय शिरकला त्याला तरी कारण ऐर्लंदच्या कोणा एका सरदारानें एका मांडलिक राजाची सुरूप पत्नी हरण करून नेली तीच. आणि अगदीं अलीकडील आमची परवांची पेशवाई नष्ट होण्याचें कारण काय ह्मणून सूक्ष्म विचारानें पाहूं लागल्यास एवढ्या मोठ्या राज्यक्रांतीला मुख्य कारण कावेबाज आनंदीबाई असें प्रत्ययास येतें. (मोठी टाळी—फार वेळ). मी स्त्रियांचा शत्रु किंवा स्त्रीशिक्षणाचा द्वेष्टा नाहीं. मी अबलांचा



पक्षपाती आहें. त्यांस योग्य स्वतंत्रता मिळून त्यांच्या हक्कांचें संरक्षण व्हावें अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. इतकेंच केवळ नव्हे. परंतु ती सफल होण्यास मजकडून यथाशक्ति जें कांहीं होण्यासारखें असेल तें लोकभीतीस न जुमानतां करण्याच्या कामीं निरंतर तत्पर असतों. तथापि जगाच्या इतिहासावरून जी गोष्ट स्पष्ट लक्ष्यांत येते तिजकडे कानाडोळा कसा करवेल? सारांश स्त्रियांप्रीत्यर्थ मोठमोठ्या अतिरथी महारथींनीं आपापले प्राण घालविले आहेत; मोठमोठीं प्रबल राष्ट्रें रसातळास गेलीं आहेत.

जी गोष्ट मोठमोठ्या प्रबळ राष्ट्रांना लागू आहे तीच लहान कुटुंबासही लागू आहे—कारण कुटुंब ह्मणजे मोठ्या राष्ट्राचें अल्प स्वरूप, दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां कुटुंबांमधील कलहास देखील मूळ कारण बहुतांशीं स्त्रियाच असतात. आजपर्यंत आपल्या कुटुंबांत बहुशः बायकाबायकांतच तंटे होत असत. बहिणभाऊ किंवा नवराबायको यांमध्यें फारसा कलह होत नसे. याचें कारण इतकेंच कीं, उभयतांच्या विचारांत पुष्कळ ऐक्य असे. आतां इंग्रजी विद्येनें पुरुषांचीं मनें कांहीं निराळ्या प्रकारचीं होऊन त्यांच्यांत आणि स्त्रियांत महदंतर पडत चाललें आहे. त्याचा परिणाम असा होतो कीं, स्त्रीपुरुषांचें एकाही बाबतींत पटत नाहीं. यांत स्त्रियांचा दोष आहे असें माझें मुळींच ह्मणणें नाहीं—दोष असेल तो सर्व पुरुषांचा आहे. कारण, सांप्रत पुरुषांना मात्र शिक्षण मिळत आहे, स्त्रिया जशाच्या तशाच जुन्या समजुतीच्या राहतात. अशा स्थितींत उभयतांच्या अचारविचारांत भिन्नभाव उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे.

आतां सांगितलेला भिन्नभाव घालवून स्त्रीपुरुषांचें ऐक्य करून कुटुंबसुखाचा पाया मजबूत करण्याचा दुसरा उपाय ह्मटला ह्मणजे स्त्रियांना आपणासारखें करणें—ह्मणजे शिक्षणाच्यायोगें त्यांच्या व आपल्या विचारांत ऐक्य करणें. ज्याप्रकारचा शिक्षणसंस्कार हल्लीं पुरुषजातीच्या मनांवर होत आहे त्याचप्रकारचा संस्कार आपल्या स्त्रीजातीच्या मनांवर होईल तर पुरुषांप्रमाणें त्यांचींही मनें सुशिक्षित होऊन वेड्यावेड्या चाली, मूर्खपणाचे आचारविचार व देवभोळ्या समजुती ह्या सर्व त्यांच्या मनांतून नाहींशा होतील. असें झालें ह्मणजे कुटुंबांतील बरेच कलह शांत होतील.

स्त्रीजाति स्वभावतःच कोमल, मोहक व प्रेमळ अशी असल्यामुळें स्त्रियांच्या बोलण्याचा, त्यांच्या उपदेशाचा, त्यांच्या शिकवणीचा ठसा पुरुषस्वभावावर फार सहजरीतीनें अति अल्प कालांत उठतो. "आपणासारिखें करिती तात्काळ, नाहीं काळवेळ तयां लागीं" असें संतमणि तुकाराम यांनीं साधूविषयीं जें एके ठिकाणीं ह्मटलें आहे तें स्त्रियांनाही पूर्णपणें लागू आहे. स्त्रिया जर सुशिक्षित सुस्वभावी, नम्र, सद्वर्तनी, विनयी अशा असल्या तर त्यांचीं मुलेंही तशींच निपजतील. हें लक्ष्यांत धरून, ही पिढी नाहीं तर नाहीं, पण पुढील पिढीची तरी तरुण प्रजा आपणासारखी व्हावी व ज्या गोष्टी आज आह्मांस खऱ्या वाटतात परंतु त्यांप्रमाणें वागण्यास प्रयत्न करूं लागलें असतां आमचीं बायकामुलें आड येतात त्या गोष्टी आपल्या पुढच्या पिढीनें तरी पूर्णपणें अमलांत आणाव्या असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं आपल्या कुटुंबामध्यें स्त्रियांस उत्तमप्रकारचें नीतिपूर्वक शिक्षण देण्यास प्रारंभ

करावा. तसेंच अशाप्रकारच्या शिक्षणानें स्त्रियांचीं मनें आपणांसारखीं होऊन त्या खऱ्या सुधारणेच्या आड कधीं यावयाच्या नाहींत. उलट अशा कृत्यास त्या सहायकारी मात्र होतील. असें झालें ह्मणजे कुटुंबांतील कलह पुष्कळांशीं दूर होतील.

३.—कोणतीही एकादी गोष्ट ग्रहण करावयाची असल्यास तिचा पूर्ण विचार करून तिचीं साधक जीं कांहीं साधनें किंवा अंगें असतील त्यांसहित ती ग्रहण केली पाहिजे. नाहीं तर पथ्य पाळल्याशिवाय घेतलेलें औषध जसें प्राणरक्षणाच्या ऐवजीं प्राणनाशास कारण होतें तशी ती हिताच्या ऐवजीं अहिताला मात्र कारण होते. तूर्त आमच्यामध्यें आह्मीं जो कांहीं स्त्रीशिक्षणाचा प्रकार सुरू केला आहे तो आमच्या कुटुंबांतील ऐक्याच्या नाशास कारण होऊन बसला आहे. याचें कारण इतकेंच कीं, आह्मीं स्त्रीशिक्षण पतकरलें परंतु त्याला साधक अशा आनुषंगिक चालीरीतींचा अद्यापि अंगीकार केला नाहीं. उदाहरणार्थ, पहा कीं, आपण आपल्या लहान मुलींस शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. मुलगी पांच सात वर्षांची झाल्यावरोबर तिला मुलींच्या शाळेंत पाठविलें. इतकें केलें असतां आपण स्त्रीशिक्षणास प्रारंभ केला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु पुढें काय चमत्कार होतो पहा! मुलगी आठ दहा वर्षांची होते तोंपर्यंत शाळेंत राहून क्रमिक पुस्तकांतील चार पांच पुस्तकें शिकते. त्रैराशिकास प्रारंभ होऊन शिवणकामास सुरवात झाली नाहीं तोंच रूढीला अनुसरून दहाव्या अकराव्या वर्षीं आईबापें तिचा विवाह करून देतात. विवाह झाल्यावरोबर तिला सासरीं जाणें भाग पडतें. सासरचीं माणसें जुन्या तऱ्हेचीं असतात, त्यांस मुलीच्या लिहिण्यावाचण्याचें कौतुक वाटत नाहीं ह्मणा, किंवा मुलगी मुलापेक्षां हुशार झाल्यास नाकापेक्षां मोती जड होईल असें वाटतें ह्मणा—तीं तिचें शाळेंत जाणें एकदम बंद करून टाकतात! मग काय? मुलीचीं आईबापें स्त्रीशिक्षणप्रिय असतात. मुलीचें शाळेंत जाणें बंद झालें, सासरीं तिला लिहूं वाचूं देत नाहींत, जाच करितात वगैरे अप्रिय गोष्टी ऐकून त्यांच्या मनाला फार विषाद वाटतो. मग काय? मुलगी माहेरीं आली ह्मणजे सासरच्या माणसांना नकळत शाळेंत जाणार! पण हा चोरीचा मामला किती दिवस चालणार? महिन्यादीडमहिन्यांत हें सासूसासऱ्यांस कळून ते मुलीला एकदां घेऊन जातात ते पुन: वर्षांचीं वर्षें पाठवीत नाहींत. या थरास गोष्ट येऊन पोंहोंचली ह्मणजे उभयकुटुंबांत कलह माजतात. सासरचीं माणसें त्या मुलीचा छळ करूं लागतात. मुलीस तो सहन होत नाहीं. शेवटीं संधी साधून ती विचारी गांजलेली अबला अविचारानें आसपास एकादी आड विहीर पाहून आपल्या जिवाचा अंत करिते!! हें कुटुंबनाटक असें शोकपर्यवसायी व्हावयाचें नसल्यास भाऊबिजेच्या निमित्तानें मुलगी जी एकदा माहेरीं येते ती परत सासरचा उमरा पहात नाहीं. बापाला स्त्रीशिक्षणाचा मोठा ओढा असतो. तो मुलीस शाळेंत पाठवितो व घरीं मास्तर ठेवितो. दोन तीन वर्षें हें कन्याशिक्षणाचें काम मोठ्या जारीनें चालतें. तितक्या काळांत व्याह्याजावयांच्या पुष्कळ लट्ठालट्या होतात. पुढें मुलगी मोठी होते. सासरच्या माणसांची समजूत करून आईबापें मुलीला सासरीं पाठवितात! गुण्यागोविंदानें ती गेली तरी सासरीं तिचें कोणाशीं पटत नाहीं. बापाच्या घरीं राहिली तरी आईचें आणि तिचें बनत नाहीं.



कसेंही झालें तरी तिच्या नांदण्याचें चांदणें होऊन जन्माचा वोजवार होऊन जातो. हा कलहाचा दावाग्नी त्या दोन कुटुंबांतच धुमसत राहत नाहीं. तर तो थेट राजदरबारीं जाऊन उभयकुलांच्या संपत्तीची सत्कीर्तीचीही राखरांगोळी करून टाकितो. असल्या गोष्टींचीं उदाहरणें पाहण्यास आपणांला फार दूर जाणें नलगे. ( मोठी टाळी—).

महाराज, एवढा हा अनर्थ कशानें होतो? नुस्तें स्त्रीशिक्षण पतकरिल्यानें आणि त्याला साधक अशीं जीं मोठमोठ्या मुलांमुलींचीं लग्नें करण्याची चाल ती टाकिल्यानें स्त्रीशिक्षण व बालविवाह या दोन्ही गोष्टी उजेड व अंधार यांसारख्या परस्पर विरुद्ध आहेत त्या एकदम साधावयाच्या नाहींत. व साधण्याचा प्रयत्न केल्यास कुटुंबसुखाला आंचवलें पाहिजे. सांप्रत आपल्या कुटुंबांत नव्याजुन्यांची जी खडाजंगी उडते तिचें तरी इंगित ही अपुर्तीच सुधारणा होय. ह्मणून आपणामधील तंटे व कलह जर बंद करावयाचे असतील तर पाश्चिमात्य सुधारणेच्या ज्या ज्या बाबींचा आह्मीं स्वीकार करूं त्यांच्या बरोबर त्यांना साधक अशा आनुषंगिक गोष्टींचाही अंगीकार केला पाहिजे. असें केल्यावांचून आमचें कुटुंबसुख अबाधित राहणार नाहीं. हा तिसरा उपाय होय.

४.—सुधारणेशीं निकटसंबंध आहे अशा साधक गोष्टींचें ग्रहण न केल्यानें आमच्या कुटुंबांत कलह उत्पन्न होतात. परंतु सुधारणेशीं ज्यांचा अर्थाअर्थीं काडीभरही संबंध नाहीं अशा गोष्टींचें आह्मीं अंधपणानें अनुकरण करितों. इंग्रेज लोक हुशार, शहाणे, धूर्त, पराक्रमी, असे आहेत हें सर्व खरें आहे. परंतु तेवढ्यावरून त्यांच्या सर्वच चाली रीती अनुकरणीय ठरत नाहींत. "गांव आहे तेथें झारवडा आहेच" ह्या व्यवहारांतल्या फार साध्या पण अतिगूढ ह्मणीचा तथ्यार्थ आमच्या आधुनिक सुधारकांच्या लक्ष्यांत अद्यापि येत नाहीं. त्यांचा असा कांहीं समज दिसतो कीं, श्वेतद्वीपांतील जें जें ह्मणून आहे तें तें सर्व शुद्ध निर्मल, निष्कलंक. अशा समजानें ते त्यांच्या वाईट चालींचेंही अनुकरण करितात. ही मोठी चूक आहे. अशानें जुन्या लोकांचीं मनें व्यर्थ दुखावून कुटुंबांत तंटे माजतात. शिवाय चांगल्यापेक्षां वाइटाचें अनुकरण सहज होतें. त्यामुळें पाश्चिमात्यांचा दीर्घ उद्योग, त्यांचा वातवेत, नियमितपणा, स्वाभिमान, वगैरे सद्गुणांचें अनुकरण होण्याचें एका बाजूस राहून त्यांचें मद्यपान, त्यांचें मांसभक्षण, त्यांच्या स्त्रियांची फाजील मोकळीक या व यांसारख्याच दुसऱ्या अनेक मूर्खपणाच्या चालींचें अनुकरण करून आमचे आधुनिक सुधारक आपल्या कुटुंबसुखाचा नाश करून घेताहेत. ह्मणून हें अंधानुकरण बंद झालें पाहिजे. जुने लोक आपल्या धर्मभोळ्या चाली हळूंहळूं आपोआप सोडून देत आहेत. वीस पंचवीस वर्षांच्या मागें आगगाडींतून प्रवास करतांना साहेबलोकांचा स्पर्श झाल्यास जुने लोक सचैल स्नान करीत—मग गाडींत उपहार करण्याची तर गोष्टच नको! परंतु हल्लीं ती सर्व स्थिती बदलून गेली आहे. सकाळ सायंकाळ स्नानसंध्या करून भस्माचे पट्टे ओढणारे व गंधाचे त्रिपुंडू लावणारे कडकडीत भिक्षुक शास्त्री देखील आगगाडींतून दशम्या कडवुळीं नेण्यास मागेंपुढें पहात नाहींत. असें असतांही मदिरापान, अभक्ष्यभक्षण, अमर्याद वर्तन यांसारख्या मूर्खपणानें त्यांच्या काळजास घरे पाडणें याहून अधिक निंद्य

कर्म तें कोणतें ? तें करणाऱ्या आधुनिक सुधारकांशीं जुन्या लोकांनीं कलह केला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ह्मणून हे कलह मिटवावयाचे असल्यास नव्या लोकांनीं हें फाजिल अनुकरण सोडिलें पाहिजे.

५.—मीं आपणास पूर्वींच सांगितलें आहे कीं, सुधारणेचीं जीं कांहीं कलमें आहेत तीं वास्तविकपणें नवीन नाहींत. त्यांचा दीर्घकालपर्यंत आह्मांस वियोग झाला होता एवढ्याच कारणानें तीं आमच्या लोकांस नवींशीं भासताहेत. त्यांचा हा भास मिथ्या आहे. सुधारणेच्या सर्व कांहीं बाबी आपणामध्यें होत्या, त्या सर्वांस योग्य शास्त्राधार आहे ह्मणून त्या शास्त्रसंमत आहेत अशाविषयीं आपापल्या कुटुंबांतील वडील माणसांची आधुनिक सुधारकांनीं खात्री करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जुन्या लोकांचा, विचारापेक्षां शास्त्रावर विशेष विश्वास आहे. ह्मणून ज्या ज्या नवीन गोष्टी आपणास प्रचारांत आणावयाच्या आहेत त्यांची इमारत निवळ विचाराच्या पायावर न उभारितां त्यांस वेदशास्त्रपुराणादि पुरातन ग्रंथांची पूर्ण संमति आहे असें दाखविलें असतां जुन्या लोकांस ह्यांच्याविषयीं तिरस्कार न वाटतां विलक्षण प्रेम उत्पन्न होईल. ही गोष्ट नवीन लोकांच्या लक्ष्यांत अद्याप यावी तशी येत नाहीं. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, परदेशीं प्रवास वगैरे गोष्टी विचारदृष्ट्या रास्त आहेत असें ह्मणून तर्कशास्त्रानें त्यांची योग्यायोग्यता जुन्या लोकांच्या मनांत उतरून देऊं ह्मटल्यास आपला प्रयत्न त्यांच्या दृष्टीनें अत्यंत हास्यास्पद होतो. आणि आपलें ह्मणणें कितीही योग्य व विचाराचें असलें तरी ते आपणास अविश्वासी, धर्मलंड, नास्तिक, अशीं विशेषणें देऊन तंडूं लागतात. अशा वितंडवादानें कुटुंबांत पुष्कळ कलह लागतात व वाद उत्पन्न होतात. हे वाद मिटण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं आपण जें कांहीं ह्मणतों त्यास वेदशास्त्रांचा व पुराणादि पूज्य मानिलेल्या ग्रंथांचा पूर्ण आधार आहे असें दाखवावें.

यावरून विचाराची योग्यता मी कमी मानितों असें कोणींही समजूं नये. विचार तर सर्व गोष्टींत अवश्यमेव असला पाहिजे. त्याशिवाय चालावयाचें नाहीं. परंतु ह्याशिवाय निरनिराळ्या प्रकारच्या लोकांची खात्री निरनिराळ्या मार्गांनीं करावी लागते. ज्यांचा विशेष भर विचारावर असेल त्यांच्या मनाचें आकर्षण विचारमार्गानें केलें पाहिजे; ज्यांना पदार्थविज्ञानासारखीं सृष्टपदार्थशास्त्रें प्रमाण असतील त्यांच्या चित्ताचें आकर्षण होतां-होईल तितकें सृष्टिशास्त्राच्या आधारानें केलें पाहिजे. तसेंच, ज्यांचा सर्व भरिभार धर्मशास्त्रावर असेल त्यांचें प्रेम शास्त्राधारावांचून प्राप्त व्हावयाचें नाहीं. मुलींना शिक्षण दिल्याच्या योगें त्या संसाराच्या कामीं दक्ष होतात; पुरुषाची प्रथमस्त्री जीवंत असतांही तीन तीन, चार चार स्त्रिया करण्याची त्यास पूर्ण परवानगी आणि बिचाऱ्या स्त्रीचा मात्र पति अगदीं अल्पवयांत जरी गत झाला तरी तिला पुनर्लग्न करण्याची बंदी असणें हा मोठा अन्याय आहे, सर्व देशांतील माणसें परमेश्वराचीं लेंकरें आहेत, तेव्हां डोंगर, पर्वत किंवा नद्या ह्यांसारख्या सीमां उल्लंघून एकांनीं दुसऱ्यांच्या देशांत जाण्यास प्रतिबंध असणें रास्त नाहीं, हें सर्व खरें आहे. परंतु, घरच्या जुन्या माणसांशीं अशा प्रकारचा बुद्धिवाद करीत बसल्यास जर त्यांचें पित्त खवळतें तर त्यांच्याशीं हा कोरडा विचारवाद करण्यांत काय



अर्थ आहे ? निरनिराळ्या शास्त्रांतील वचनें काढून त्यांचा आपल्या ह्मणण्यास पूर्ण आधार आहे असें त्यांच्या प्रत्ययास आणून दिल्यास आपण जें कांहीं ह्मणतों त्यावर त्यांचा तत्काल विश्वास बसून ते विचार करूं लागतील. अर्थात अज्ञानें सर्व वाद मिटेल.

हें करणें फारसें कठीण नाहीं प्रथमच्या कित्येक सुधारकांनीं पहिल्यापहिल्यानें ह्या दिशेनें कांहीं प्रयत्न केले होते. परंतु अलीकडील सुधारकांच्या हातून तशा प्रकारचें कांहीं एक होत नाहीं. ह्या नवीन गोष्टींस जुन्या शास्त्रांत कसचा आधार मिळणार, असें त्यांस वाटतें परंतु ही मोठी चूक आहे. पुरातन ग्रंथांचें लक्षपूर्वक अवलोकन केल्यास सुधारणेच्या सर्व गोष्टींस पाहिजे त्या प्रकारचा शास्त्राधार मिळण्यासारखा आहे. परंतु आमची स्थिति साधु **तुकारामांनीं**—"तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा चुकलासी"—असें जें ह्मटलें आहे त्या प्रमाणें झाली आहे. धर्मशास्त्राचें अवलोकन करण्यास मोठी विद्वत्ता, दीर्घपरिश्रम व विलक्षण चित्तस्वास्थ्य वगैरे आंगीं असावीं लागतात. तीं आह्मांमधून नाहींशीं होत चाललीं आहेत. हें योग्य नाहीं. जुन्या लोकांवर आपली छाप बसवून त्यांच्या अंत:करणांत आपल्या ह्मणण्याच्या सत्यतेविषयीं विश्वास उत्पन्न करावयाचा असल्यास आपल्या मतांस शास्त्राधार आहे असें सिद्ध करून दाखविलें पाहिजे असें केल्यास उभय पक्षांमधील बराच वाद मिटेल.

६.—नुकेंच सांगितल्याप्रमाणें सुधारणेच्या गोष्टींस शास्त्राधार दाखविल्यानंतर ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. कीं सुधारणेच्या ज्या ज्या प्रकारांचें आपणांस अनुकरण करावयाचें आहे त्या त्या सर्व प्रकारांस एतद्देशीय स्वरूप दिलें पाहिजे, ह्मणजे काल देश वर्तमान इत्यादिकांच्या धोरणानें त्यांमध्यें फेरफार करून आपली रीतभात, व्यवहार, लोकाचार हे सर्व होतील तितके कायम राखून त्यांचें अवलंबन केलें पाहिजे. इंग्रेज लोकांच्या अमुक चाली चांगल्या खऱ्या. परंतु त्या जशाच्या तशा घेतल्या असतां त्या आमच्या रीतीभातींशीं न जुळून आपणामध्यें व आपल्या सख्यासोयऱ्यांमध्यें व्यर्थ वितुष्ट माजण्याचा संभव आहे तर त्यांचें रूपांतर करून त्या आपल्या पथ्यावर पडतील अशा प्रकारें ग्रहण केल्या पाहिजेत. हें तत्त्व सुधारकांच्या लक्ष्यांत न राहून कधीं कधीं कुटुंबामध्यें व्यर्थ कलह लागतात. उदाहरणार्थ स्त्रीशिक्षणाचा प्रकार घ्या. अलीकडे आमच्या मुलांस जसें पाश्चिमात्य धर्तीचें शिक्षण मिळत आहे त्याचप्रमाणें मुलींच्या शाळांतून मुलींसही निवळ पोषाखी शिक्षण मिळत आहे. लोंकरीचें शृंगारिक विणकाम किंवा कशिद्याचें काम, हार्मोनिअम पिआनो यांसारखीं ऐष आरामी व विदेशी संगीत वाद्यें वाजविणें, पुण्याच्या फिमेल हैस्कुलांत मुलींना शिकविण्यांत येणारे दोरीवर नाचण्याचे वगैरे परदेशी खेळ, वगैरे हल्लींच्या स्त्रीशिक्षण क्रमांतील बहुतेक प्रकार निवळ पाश्चिमात्य आहेत. त्यांचा आह्मांस बिलकुल उपयोग नाहीं इतकेंच नव्हे परंतु त्याच्या अवलोकनानें जुन्या मंडळीस स्त्रीशिक्षणाचा तिटकारा येऊन ते त्याची निंदा करितात. व नवीन लोकांस मोठें दूषण देतात. अशा प्रकारचा शिक्षणक्रम क्रमून जें स्त्रीमंडळ तयार होतें तें मोठें अभिमानी, अमर्याद, व फाजील महत्त्वकांक्षी अशा प्रकारचें निपजून संसारामध्यें सर्व प्रकारच्या कलहास कारण होऊन बसतें. अशा मुली आईबापांस जुमानीत नाहींत, सासूसासऱ्यांचें ऐकत नाहींत व पतीची कोणत्याही प्रकारें पर्वा करीत

५

नाहींत. त्यांच्या वर्तनानें जुन्या लोकांच्या मनास विषाद होतो. यासाठीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार करितांना आपल्या संसारामध्यें स्त्रियांस उपयोगीं पडतील अशाच गोष्टी त्यांस शिकविल्या पाहिजेत. असें झालें असतां कुटुंबामध्यें संसारकृत्यास हातभार लावण्यास त्या समर्थ होऊन घरांतील वडील माणसांस मोठा संतोष होईल. हें मध्यम प्रतीच्या स्त्रीशिक्षणाविषयीं झालें.

ज्यांस संसाराचीं निवळ आंगमेहनतीचीं कामें करण्याचा फारसा प्रसंग येण्याचा संभव नाहीं अशा श्रीमान् लोकांच्याही स्त्रियांच्या शिक्षणांत असाच प्रकार असला पाहिजे. सवड असून द्रव्याचें सहाय्य असल्यास वैद्यकीसारख्या परोपकारांचा व देशकल्याणाचा एकादा धंदा पाहिजे असल्यास त्यांनीं शिकावा. परंतु त्यांस विलायतेस किंवा अमेरिकेंत हजारों कोसांवर पाठवून क्षयाची भावना होईपर्यंत " अक्वा प्युरा " आणि " टिंक्चर सिन्यामन " यांसारख्या पाश्चात्य वैद्यकांची संज्ञा देऊन जीव टाकण्यास इकडे परत आणण्यांत काय अर्थ? पाश्चात्य वैद्यकांतच स्त्रियांना निष्णात करावयाच्या आहेत तर इकडे काय तशा वैद्यकाच्या पाठशाळा नाहींत ? पुष्कळ आहेत ! परंतु इतकें करण्याची मुळीं जरूरीच नाहीं. स्त्रीवैद्य पाहिजे आहेत तर आमच्या इकडे सुइणीच्या कामांत वैद्यकविद्यालयांतून पास झालेल्या स्त्रियांस आमचें देशीवैद्यक शिकवून तयार केल्यास होणार नाहीं काय ? परंतु इतकी पंचाईत करावी कोणीं ? स्त्रियांस शिक्षण द्यावयाचें, तर वनवा त्यांस प्रतिमडमसाहेब ! स्त्रीवैद्य पाहिजे आहेत, तर भरा तारवें आणि पाठवा समुद्र पार !! असा प्रकार चालला आहे. अशानें जर कुटुंबांत कलह झाले आणि आमच्या संसारसुखाची राखरांगोळी झाली तर त्यांत काय नवल आहे ?

ह्मणून, कुटुंब कलह बंद करावयाचे असल्यास आमच्या नव्या मंडळींनीं पाश्चिमात्य सुधारणेची हुबेहुब नक्कल करण्याच्या भरीस सहसा पडूं नये. त्यांच्या सुधारणेस एतद्देशीय स्वरूप देऊन तिचें रूपांतर करून नंतर तिचें पाणिग्रहण करावें.

७.—जुन्या व नव्या लोकांत विपर्यास होण्याचें आणखी एक कारण आहे. आपल्या सामाजिक दोषांचें अतिशयोक्तीनें वर्णन करून परकी लोकांपुढें आपल्या गृहस्थितीचें प्रदर्शन करण्याची आमच्या नव्या लोकांस मोठी हौस वाटते. सर्व राष्ट्रांतल्या लोकांत अधिकउण्या अंशानें दोष असतातच. सर्व प्रकारें निर्दोष असें राष्ट्र साऱ्या जगांत एकही सांपडणार नाहीं. सुधारणेच्या अगदीं उच्च शिखरावर जाऊन बसलेला इंग्लंडदेश घ्या, किंवा स्वतंत्रतेच्या अफाट सागरांत यथेच्छ पोंहणारें अमेरिकाखंड घ्या, त्यांत देखील दुष्ट चाली, निंद्य आचार, अप्रयोजक रीतिभाति पाहिजे तितक्या भरलेल्या आहेत. त्या आमच्या एकट्या बापड्या हिंदुस्थानाच्याच वांट्यास आल्या आहेत असें नाहीं. इतर देशांप्रमाणें—कदाचित् इतर देशांपेक्षां कांकणभर अधिक मानानें—आमच्या लोकांत कांहीं निंद्य गोष्टी असतील. परंतु त्यांचें अतिशयोक्तीनें वर्णन करून त्यांची व्याप्ति आहे त्याहून अधिक भासविण्याचें काय प्रयोजन ? इतर राष्ट्रांप्रमाणें आमच्याही समाज स्वरूपांत कांहीं व्यंगें असतील ! परंतु तेवढ्यांवरून आपण अगदीं कुरूप, राक्षसी स्वभावाचे दुष्ट



प्राणी आहोंत असें आपलें आपण चित्र काढून घेण्याची मुळींच गरज नाहीं—आणि असें खोटेंनाटें विकृत केलेलें आत्मस्वरूप परकी लोकांकडून त्रयस्थांस दाखविणें यांसारखें अधमपण तें दुसरें कोणतें ? ( टाळी ) आमचीं गृहच्छिद्रें काय आहेत तीं आमचीं आह्मांस चांगलीं ठाऊक आहेत. त्यांचें वर्णन करण्यास **मलबारी**सारखा फाजिल फर्डा कलमबहादर कशास पाहिजे ? ( टाळी ) त्याच्या फाजील वर्णनानें इंग्रजांसारख्या तिऱ्हाइत लोकांस आमच्याविषयीं काय वाटेल बरें ? त्याचें परक्याचें एक असो ! पण आमचें आह्मीं तरी कांहीं उमगलें पाहिजे कीं नाहीं ? त्यानें जर आमच्या सगळ्या हिंदुसमाजाची कृष्णकीर्ति परकी लोकांसमोर गाण्याचें निंद्यकर्म आरंभिलें तर आह्मीं त्याचें तोंड बंद करण्याचें सोडून त्यालाच सूर देऊं लागलों तर आमच्या जुन्या लोकांस आह्मीं वैऱ्याप्रमाणें दिसलों आणि त्यांनीं आमच्याशीं दावा मांडिला तर त्यांत त्यांचेकडे काय दोष ? सारा दोष आमचाच असें प्रांजलबुद्धीनें कबूल केलें पाहिजे.

नव्या लोकांनीं हा क्रम सोडिला पाहिजे. आपल्या गृहस्थितीचा आपणच विचार केला पाहिजे. आज जसे आपण एका जातीचे, एका धर्माचे, एका समाजाचे ५००—७०० लोक ह्या स्थलीं एकत्र जमलों आहों तसे जमूं या. आणि आपल्या गृहस्थितींत कसलीं कसलीं व्यंगें आहेत याचा एक मतानें आपापणांतच विचार करूं या. अशा गृहसंबंधीं नाजुक कामांत परक्यास घेण्याचें प्रयोजन नाहीं. आमचें राष्ट्र जिंकलेलें, आह्मीं पादाक्रांत झालेले त्यामुळें आमच्यांत शौर्य, पराक्रम वगैरे कांहीं नाहीं असें मानणाऱ्या परकी लोकांसमोर आपण आपलीं गृहच्छिद्रें व्यक्त केल्यानें ते लोक आपणास फारच हलके समजतात. हें जुन्या लोकांस बिलकुल सहन होत नाहीं. गृहदोषांचें नसतें विकृतस्वरूप कोणी वर्णन करूं लागला ह्मणजे असे दोष आह्मांमध्यें मुळींच नाहींत असें जुने लोक प्रतिपादन करूं लागतात. अशाप्रकारें उभयपक्ष हट्टास पेटले ह्मणजे त्यांमध्यें कलह माजतात. सांप्रत आमच्या समाजाची अशीच स्थिति झाली आहे. ती नाहींशी होण्यास नव्या लोकांनीं आपल्या समाजांतील दोषांचें मिथ्याप्रदर्शन करण्याची निंद्य संवय सोडिली पाहिजे.

८.—कोणत्याही दोन पक्षांतील कलह मिटून त्यांमध्यें ऐक्य होण्यास प्रत्येक पक्षानें अंमळ मागें घेतलें पाहिजे. दोघेही आपापला हेका धरून बसतील तर कलह संपणार नाहीं. त्याचप्रमाणें कुटुंबांत व लोकसमाजांत जुन्या नव्या पक्षांत जें द्वंद्व माजलें आहे तें प्रत्येक पक्षानें अंमळ पिछेहट करून विरुद्ध पक्षाचें थोडेसें ऐकल्यासारखें केल्याशिवाय कदापि बंद होणार नाहीं. पाश्चिमात्य तेवढें चांगलें असें नव्यांनींही ह्मणूं नये आणि जुन्यांनींही " पुराणमित्येव न साधु मन्यते " या **कालिदास** कवीच्या उक्तीवर दृष्टि ठेवून जुन्या विषयींचा आपला दुरभिमान अंमळ शिथिल करावा. सारांश उभयतांनींही अंमळ विचारवश होऊन दुराग्रह सोडिला पाहिजे. प्रत्येक समाजास कांहीं एक परंपरा असते. त्याप्रमाणें हिंदुसमाजास ही पुरातन कालापासूनची एक परंपरा आहे. ती त्याच्या हाडामांसाशीं अगदीं खिळून गेली आहे. तिच्या विरुद्ध गेलें असतां आपणास यश येणार नाहीं असें समजून जें कांहीं करावयाचें तें ह्या परंपरेच्या आड न येई अशा बेतानें केलें पाहिजे. हें नव्यांनीं लक्ष्यांत धरावें.

तसेंच हल्लींचें मन्वंतर बदललें. त्याबरोबर आपलें आवरणही बदललें. तदनुरूप आपल्या आचारविचारांतही बदल झाली पाहिजे. हें जुन्यांनीं निरंतर लक्ष्यांत वागविलें पाहिजे. हल्लींच्या काळांत त्रेतायुगांतील रीतिभातो नवीन प्रजेस पसंत न पडल्यास विशेष विषाद न मानतां संसारांत शांत वृत्ति धारण करणें हेंच आपलें महत्कर्तव्य असें जर जुनी मंडळी समजेल तर कुटुंबांत कधींही कलह होणार नाहींत.

९.—अमुक अमुक सुधारणा होणें इष्ट आहे असें नव्या लोकांच्या मनानें एकदां घेतलें ह्मणजे त्यांच्याविषयीं ते फार उतावीळ होतात. आपणा स्वत:विषयीं ते फार उतावीळ असतात अशांतला अर्थ नाहीं—स्वत:विषयीं तर ते फार धिमे शांत असतात. सगळी जी कांहीं आतुरता असते ती दुसऱ्याविषयीं असते. या कामीं त्यांचा सर्व व्यवहार द्वितीयपुरुषी असतो. "तुह्मीं" असें करा; "तुह्मीं" तसें करा! "तुमच्यांत" धैर्य नाहीं; "तुमच्यांत" आस्था नाहीं!! अशाप्रकारचा निवळ द्वितीयपुरुषी बोध करणारे व दुसरे लोक "कांहीं करीत नाहींत" असा जप करून चित्ताचा अस्वस्थपणा दाखविणारे पुष्कळ तरुण सुधारक आमच्यांत आहेत. त्यांस आपण स्वत:विषयीं तर कांहीं एक करवत नाहीं; परंतु इतराविषयीं त्यांना विलक्षण काळजी असते. पण ही मोठी चूक आहे. आपण आपणाविषयीं अत्यंतातुर असावें. विचारदृष्ट्या खरें वाटेल त्याचा अंगीकार करण्यास बिलकुल विलंब करूं नये—काडीमात्रही मागेंपुढें पाहूं नये. परंतु साऱ्या समाजाविषयीं शांतवृत्तीनें वाट पाहिली पाहिजे.

आपल्या विचाराविषयीं आपण जबाबदार आहों. लोकसमाजाची जबाबदारी आपल्या शिरावर नाहीं. जें कांहीं आपणास खरें दिसतें तें लोकांस प्रांजल बुद्धीनें निरंतर सांगत असावें व स्वत:च्या आचरणानें त्या प्रेमानें वागून दाखवावें. इतकेंही करून लोकसमाज किंवा कुटुंबांतील माणसें आपलें अनुकरण करीत नाहींत ह्मणून उतावळी करूं नये किंवा खेदही मानूं नये.

कोणत्याही कृत्याकडे मोठमोठ्या समाजांची प्रवृत्ति एकाएकीं होत नाहीं. आणि ती तशी होत नाहीं हेंच बरें आहे. तीन दिवसांत तेरड्याचे जसे तीन रंग होतात तसे जर लोकसमाज पटापट बदलूं लागले तर त्यांत एकही गोष्ट स्थिर राहणार नाहीं. सृष्टीचा नियमच असा आहे कीं, दीर्घकालपर्यंत टिकणारी गोष्ट उदयास येण्यासही दीर्घ काल लागावा. पहा, कीं जे वृक्ष फार दिवस टिकतात ते वाढण्यासही फार दिवस लागतात. तसाच प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं असा एक साधारण नियम शोधून काढिला आहे कीं, जे प्राणी दीर्घकालपर्यंत वांचतात ते त्याचमानानें गर्भवासांतही दीर्घकालपर्यंत असतात. हाच नियम आपल्या सुधारणेस लाविल्यास असें स्पष्ट सिद्ध होतें कीं, जी सुधारणा दीर्घकालपर्यंत टिकावयास पाहिजे आहे ती उदयास येऊन लोकमान्य होण्यासही बराच काल लागला पाहिजे. सारांश नव्या मंडळीनें उतावीळ होतां उपयोगी नाहीं. व्यर्थ उतावळीनें प्रतिपक्ष्याचीं मनें दुखावलीं जाऊन ते आपला छल करूं लागतात. तेच आपण शांत स्थिर असलों तर त्यांच्या मनांत आपणाविषयीं पूज्यभाव उत्पन्न होऊन सर्व कलह मिटतील.



नव्या लोकांनीं कुटुंबामध्यें तर मुळींच उतावीळ होऊं नये. आपली योग्यता कितीही मोठी असली तरी कुटुंबांतील माणसांशीं सहसा तिरस्कार बुद्धीनें वागतां कामा नये. त्यांच्या जुन्या विचारांवरून जर त्यांचा आपण छल किंवा उपहास करूं लागलें तर त्याचा परिणाम फार वाईट होतो. ह्मणून कुटुंबांत द्वेषभाव न वाढावा व जुन्यांनीं आपणाशीं तंटाभांडण न करावें एतदर्थ नव्या लोकांनीं आपण आपलें कर्तव्य करून शांत रहावें.

१०.—जुन्या व नव्या लोकांनीं एकमेकांशीं कोणत्या रीतीनें वागावें ह्मणजे उभयतांमध्यें ऐक्य राहून कलह मिटतील, हें एथपर्यंत मीं आपणांस कथन केलें. शेवटीं आणखी एका उपायाचा विचार करून मी माझ्या लांबलेल्या भाषणाचा उपसंहार करितों.

कुटुंबांत कलहाला प्रारंभ केव्हां होतो? जावत्कालपर्यंत कुटुंबामध्यें मुलांची वृद्ध माता जीवंत असते तावत्कालपर्यंत भाऊ भाऊ फारसे भांडत नाहींत. भांडूं लागले तरी ती पिकल्या केंसांची आई "बाबानों, असें करूं नका, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तरी कलह करूं नका. मी एकदां गेलें ह्मणजे काय पाहिजे तें करा." असें त्यांस सांगून त्यांची समजूत घालते. मुलेंही तिचें बोलणें ऐकिल्यासारिखें तरी करितात.

महाराज, ज्याप्रमाणें कुटुंबांत झातारी पिकल्या केंसांची आई कायम असते तोंपर्यंत कलहाला फारशी सुरुवात होत नाहीं, त्याचप्रमाणें परमेश्वर, विश्वजननी ही जावत्कालपर्यंत आपल्या हृदयमंदिरांत वास करिते आहे तावत्कालपर्यंत आपल्या कुटुंबास कलहाची बाधा कालत्रयींही होणार नाहीं. अंत:करणांत कलहाग्नी धुमसूं लागला कीं मनुष्यास विश्वजननीचा विसर पडला असें समजावें. एतदर्थ कुटुंबकलहांची परिसमाप्ति करून संसारामध्यें ऐक्यसुखाचा लाभ घेणें असल्यास परमेश्वरास नेहमीं अंत:करणांत वागविलें पाहिजे. ह्या जगन्मातेच्या प्रेममय अंकावर बसून तिच्या शांत, सुहास्य मुखाकडे अवलोकन करून शांति, आनंद, समाधान इत्यादि गुणांचें अवलंबन केल्यास सर्व भेद नष्ट होतील—अर्थात सर्व कलहही मिटतील. (टाळी) महाराज, एका कालीं सर्व आकाश ढगांनीं व्याप्त झालें. सर्वत्र अंधकार पडला. वारा मोठा जोराचा सुटला. मोठें तुफान झालें. त्या झिंझावातानें मोठमोठीं तारवें समुद्रांत बुडून गेलीं. ताडमाड यांसारखे उंचउंच वृक्ष समूळ उन्मळून पडले. हा प्रकार कांहींवेळ होऊन पुन: पूर्ववत सर्वत्र शांतता झाली. तेव्हां एक विवेकी गृहस्थ बाहेर रानामधून मार्गक्रमण करीत असतां, त्यानें एक चमत्कार अवलोकन केला. नुक्तेंच बंद झालेल्या प्रबल तुफानाच्या तडाक्यानें चौफेर आसपास पुष्कळच वृक्ष उलथून पडले होते. परंतु त्या सर्वांत अत्यंत प्रचंड विस्तीर्ण ज्याच्या शाखा दूरवर पसरल्या आहेत असा, गगनचुंबी पर्वतप्राय एक वटवृक्ष जमिनीवर पडला होता. त्याचीं दूरदूर जाणारीं मुळें सारीं उघडीं पडून त्यांच्या योगें बुंधापाशीं मोठा खाडा पडला होता. ह्याच वृक्षाच्या जवळ कांहीं अंतरावर एकप्रकारचें उंच गवत वाढलें होतें. तें जसेंच्या तसेंच टवटवीत दिसत होतें. त्या अफाट वादळाच्या योगें त्या गवतास यत्किंचितही इजा झाली नव्हती. हें पाहून त्या गृहस्थास मोठें आश्चर्य वाटलें. तेव्हां त्यानें त्या गवतास विचारिलें कीं बाबा ज्या झिंझावातानें या वटवृक्षासारखे प्रचंड वृक्ष व उंच इमारती जमीन-

दोस्त झाल्या त्या वाऱ्याच्या सोसाट्यापुढें तूं कसा टिकलास ? त्या प्रसंगीं त्या तृणास वाचा फुटून त्यानें सांगितलें कीं "महाराज हे वृक्ष मोठे अभिमानी व महत्त्वाकांक्षी आहेत. ते आपल्या पृथ्वीमातेपासून उंच आकाशांत जाऊं पाहतात. तसेंच आडवा वारा आल्यास त्याला प्रतिबंध करूं पाहतात. परंतु माझें तसें नाहीं. कितीही जोराचा वारा सुटला तरी मी त्यास पाठ देऊन मस्तक नम्र करितों आणि माझ्या पृथ्वीमातेस घट्ट धरून राहतों. ह्या-मुळें माझा संभाळ होतो." आमच्या नवीन लोकांनीं या तृणाप्रमाणें नम्र झालें पाहिजे. आपल्या विचाराबद्दल लोक जोंजों आपला छल करितील तोंतों आपण अधिक नम्र झालें पाहिजे—अधिक विनय संपादन केला पाहिजे. घरांतील वडील माणसांनीं कितीही दोष दिला तरी त्यांचा उपमर्द करावयाचा नाहीं असा निश्चय करून त्याप्रमाणें जर नवीन मंडळी वागेल तर आमच्या कुटुंबांतील सर्व कलह खास बंद होतील. कारण साधु तुकारा-मांनींही ह्मटलें आहे—" नम्र झाला भूतां, तेणें कोंडिलें **अनंता.**"

## विषय ३ रा. ह्याजवर रा. रा. शंकर गोपाळ साठे ह्यांचें भाषण.

सभासदहो, आपल्या जुन्या नाटकामध्यें राक्षसांचीं अथवा मोठमोठ्या शूरांचीं युद्धें जाहलीं ह्मणजे जसा विदूषक रंगभूमीवर येऊन आंब्याच्या टाहळ्यांनीं सूत्रधारावरोबर वेड्यावांकड्या उड्या मारून ज्याप्रमाणें युद्धाची नक्कल करून दाखवितो त्याप्रमाणें अगर रुपयाचे दोन दाणे मिळणारे असे उत्तम हपूसचे कलमी आंबे यांचा मधुरस्वाद घेतल्यावर चिकाळ, आं-वट अशा रायवळ बिव्या खाल्यानें ज्याप्रमाणें तोंड वाईट होतें त्याचप्रमाणें गेल्या तीन दि-वसांमध्यें मजपेक्षां वयानें व विद्येनें मोठे अशा पुरुषांचीं सुरस भाषणें ऐकल्यावर मजसा-रख्या लहान मुलाचें बोलणें आपल्या कानास चांगलें लागणार नाहीं हें मला माहीत आहे. कारण, असल्या सभेंत मी पूर्वीं कधींही बोललों नाहीं. व बोलण्याचें सामर्थ्यही नाहीं. तथापि आकाशामध्यें लहान माशीपासून तों मोठ्या घारीपर्यंत सर्व पक्षी आपापल्या साम-र्थ्याप्रमाणें उडतच आहेत. व घार फार उंच उडते ह्मणून चिमणीनें उडावयाचें टाकून देऊन आपलें घरटें धरून कधींही बसली आहे काय ? व बसली तर तिचें चालेल काय ? अर्थात् कधींहि चालावयाचें नाहीं. हें मनांत आणून मंडळीनें लडिवाळपणानें मुलांना जर बोल-ण्याची परवानगी दिली आहे, तर आपणही यथाशक्ति तिसऱ्या विषयावर दोन वेडेवांकडे शब्द बोलावे अशी इच्छा धरून आपल्यासारख्या विद्वान् श्रोते मंडळीच्या समोर उभें रा-हण्याचें धारिष्ट केलें आहे. तर सज्जनहो, माझ्या बोलण्यांत ज्या चुक्या होतील, व चुक्या होतील हें मला माहीतच आहे. त्यांची माफी कराल अशी माझी आशा आहे.

२ आजचा विषय आपण कोणच्या प्रकारचें ज्ञान मिळवावें ह्मणजे आपलें हित होईल हा आहे. ह्या प्रश्नाचा प्रथम चांगला उलगडा केला पाहिजे, कारण कोणत्याही प्रश्नाची प्रथम चांगली समजूत झाल्याशिवाय योग्य उत्तर देतां यावयाचें नाहीं. आपण ह्मणजे तुह्मी आह्मी अर्थात् सर्व मनुष्यजात हिनें कोणच्या प्रकारचें ज्ञान ह्मणजे कोणच्या प्रकारची मा-हिती मिळविली ह्मणजे तिचें हित होईल. असा जर अर्थ घेतला तर प्रश्न फार बिकट



होणार आहे, कारण मीं जें विद्वान् लोकांच्या तोंडून ऐकिलें आहे व जें वाचलें आहे त्याव-रून या मोठ्या विषयावर मोठमोठ्या विद्वानांनीं व तत्त्ववेत्त्यांनीं पुष्कळ ग्रंथ केले आहेत, तथापि मनुष्यांचें खरें हित कोणतें आहे व तें कोणत्या ज्ञानानें मिळण्यासारखें आहे हें स्पष्ट समजलें नाहीं. मनुष्याचें खरें हित केवळ पैसा मिळविण्यांतच आहे किंवा कीर्ति मिळ-विण्यांतच आहे, किंवा सर्व संसाराचा त्याग करून ईश्वरभजन करण्यांत आहे, याचा उल-गडा होणें कठीण आहे, आणि तशांत माझ्यासारख्या बारा वर्षांच्या आंतील मुलास ह्मणजे ज्याला अजून पुष्कळ पाहावयाचें आहे, व ज्याला अजून पुष्कळ वांचावयाचें आहे, अशानें त्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे ठेंगण्या मनुष्यानें ताडाचे झाडावरील फळ हातानें तोडून काढण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणें आहे. ह्मणून मी लहान तोंडीं मोठा घांस घेत नाहीं. मी या प्रश्नाचा अर्थ असा करतों कीं, आपण ह्मणजे माझ्यासारख्या ल-हान मुलांनीं लहानपणीं काय शिकावें ह्मणजे त्यांचें अर्थात् मोठेपणीं हित होईल ह्मणजे ते मोठेपणीं सुखानें संसार करतील. हाही प्रश्न कांहीं सोपा आहे असें नाहीं. कारण मोठे-पणीं कशानें हित होईल हें मोठें जाहल्याशिवाय बरोबर कळावयाचें नाहीं. ह्मटलेंच आहे कीं, " पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥" असो. तथापि त्या प्रश्नाबद्दल मला जे दोन शब्द सुचले आहेत ते आपणापुढें सादर करण्याची मी पर-वानगी घेतों.

३. मला वाटतें, आपण कोणत्या प्रकारचें ज्ञान मिळवावें ह्मणजे आपलें हित होईल, असें विचारणाऱ्याच्या मनांत कांहीं ज्ञानापासून हित होईल व कांहींपासून अहित होईल असें आहे असें दिसतें. परंतु विचार केला असतां ज्ञानापासून अनर्थ होतील असें मला दिसत नाहीं कदाचित् चोरी करण्याच्या ज्ञानापासून अनर्थ होतात, असें कोणास वाटेल परंतु माझें मत असें आहे कीं, चोरी केल्यापासून अनर्थ होतात परंतु चोरी चोर कशी करतात हें कळल्यापासून कांहीं एक नुकसान होण्याचें कारण नाहीं. उलटा झाला तर फायदाच होईल. पोलीस कामगाराला ही कला जर चांगली माहीत असली तर तो चोराचा माग हां हां ह्मणतां काढूं शकेल, माझें ह्मणण्याचें तात्पर्य इतकेंच कीं ज्ञानापासून तोटा व्हावयाचा नाहीं. कोणतीही गोष्ट स्वत: चांगली आहे किंवा वाईट आहे असें ह्मणतां येत नाहीं जशी आपण तिची योजना करूं तशी ती चांगली अगर वाईट होणारी आहे. उदा-हरणार्थ, फार लांब नको विस्तवच घ्या. विस्तव जर स्वयंपाकाच्या उपयोगीं लाविला तर फार उपयोगीं आहे. आणि जर का घराला आग लावण्याच्या कामीं लावला तर फार वाईट आहे. असो याविषयीं जर बोलूं लागलों तर मूळचा विषय सुटेल. मनुष्याचें हित होण्याला प्रथम त्याला खावयास पाहिजे, पांघरायाला वस्त्र पाहिजे, व रहावयास घर पाहिजे. कारण शरीर हें मूळ सुखाचें कारण होय. आणि त्याच्या रक्षणार्थ मुलांनीं उदरनिर्वाहाचे धंदे केले पाहिजेत. मग तो धंदा शेतीचा असो, अथवा व्यापाराचा असो, अथवा कारकुनीचा असो, परंतु भामटेगिरीचा उपयोगी नाहींहो. त्यांत एखादेवेळीं डबोलें मिळेल परंतु कधीं मरूं याचा नेम नाहीं. आतां जो धंदा करावयाचा तो आपल्या बुद्धीप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें जो

चांगला साधून ज्यांत पुष्कळ पैसा मिळेल तोच शिकावा. काल, देश, वर्तमान या सर्व गोष्टींचा विचार करून जें शिकणें असेल तें शिकावें. समजा मी आतां व्यापार किंवा इंग्रजी न शिकतां घनपाठी झालों तर काय उपयोग. आधीं कोणाला संहिताच नको आहे तर घनाला पुसतो आहे कोण. तुझी घनपाठी असा कीं जटापाठी असा तुमच्या कपाळची याचना ( भीक ) कधींही सुटावयाची नाहीं. कारण काळच तसा आहे. हल्लीं B. A., M. A., L. L. B., L. C., M. D.; असें झाल्याशिवाय परिणामच नाहीं. व त्यापासूनही हल्लीं फायदा होतो असें नाहीं. कारण पूर्वीं ज्याप्रमाणें त्या परीक्षांचें मान असे त्याप्रमाणें हल्लीं उरलें नाहीं. हल्लीं लोकांचें लक्ष कलाकौशल्याकडे गेलें आहे. पैसा मिळविण्याकरितां त्याच विद्या लोकांनीं शिकल्या पाहिजेत. सारांश, निरनिराळ्या कालीं निरनिराळ्या देशीं निरनिराळ्या विद्येचें माहात्म्य असतें त्या विद्या लोकांनीं शिकलें असतां लोकांचें हित होतें. परंतु सर्व कालीं व सर्व देशीं अवश्य लागणारा गुण ह्मटला ह्मणजे खरेपणा अथवा इमानीपणा हा होय.

मनुष्याच्या आंगीं कोणतीहि विद्या असो व तो कोणताही धंदा करो परंतु त्याच्या आंगीं खरेपणा हा नसेल तर त्याला त्या विद्येमध्यें व त्या धंद्यामध्यें कधींही यश यावयाचें नाहीं. खोट्या व्यापाऱ्याचें पहिल्यापहिल्यानें चांगलें चालेल, परंतु जेव्हां का त्याचा खोटेपणा उघडकीस येईल तेव्हां त्याच्याकडे कोणी जाणार नाहीं व त्याच्याशीं व्यापारही कोणी करणार नाहीं. ह्याला इंग्रजींत एक ह्मण आहे कीं "Honesty is the best policy." ह्मणजे प्रामाणिकपणाची रीत ही सर्वांत उत्तम होय. कारकुनीच्या धंद्यांत काय, वकीलीच्या धंद्यांत काय, कोणत्याही धंद्यांत काय त्यांत प्रामाणिकपणा पाहिजेच. ह्याकरितां सर्व मुलांनीं उत्तम नीतीचा मार्ग हा लहानपणापासून शिकला पाहिजे. व त्यांच्या आईबापांनीं त्यांस तो शिकविला पाहिजे. कारण, लहानपणी जर कां एकदां खोटें बोलण्याची अगर चोरी करण्याची अगर दुसरी वाईट संवय लागली तर ती जाण्यास फार कठीण पडतें. मराठी चौथ्या पुस्तकांत सांगितलेंच आहे कीं,—

"वाळपणीं वाळांची कोमलतरुतुल्य वुद्धि वांकेल ॥
घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥ १ ॥"

ह्मणजे झाडाला वळण द्यावयाचें असलें तर तें जसें कोवळेपणीं दिलें असतां चांगलें वळतें. त्याप्रमाणें मनुष्याच्या आंगीं मोठेपणीं चांगले गुण असावे असें जर वाटत असलें तर त्या गुणांचें वीज लहानपणीच पेरलें पाहिजे. ह्यावर दाखला त्याच चौथ्या पुस्तकांत एक मोठा मौजेचा दिला आहे. कीं एक मुलगा होता त्याच्या आईनें त्यास शाळेंत घातलें होतें, त्यानें एके दिवशीं आपल्या वर्गांतील मुलाची एक वस्त चोरून आणिली व ती आपल्या आईजवळ आणून दिली तेव्हां तिणें त्याला शिक्षा न करतां उलटी शावासकी दिली, व आणखी एक पेरू खावयास दिला, तेव्हां त्याला वाटलें कीं आपण जर असेंच मिळविलें, तर आपल्याला जास्ती शावासकी मिळेल व खाऊ मिळेल. व त्याला असें वाटलें कीं आपण मिळवावें; पण कोणत्या प्रकारानें मिळवावें हें कांहीं त्याला समजलें नव्हतें, समजेल कोठून



त्याला कोणी शिकविलेंच नाहीं ह्मणून तो उत्तरोत्तर जास्ती चोऱ्या करूं लागला, व शेवटीं एका मोठ्या दरवड्यांत सांपडला. तिकडचा न्याय व रीति ही निराळी असल्याकारणानें त्याजविषयीं चौकशी होऊन शेवटीं त्याला फांशीची शिक्षा ठरली. ज्या दिवशीं त्याला फांशीं द्यावयाचा त्या दिवशीं तेथें पुष्कळ मंडळी जमली होती. मनुष्याची चालच आहे कीं जरी कोणाचें वाईट होत असलें तरी तेथें मंडळी आपली जमावयाचीच, असो. तेथें त्याची आईही येऊन स्फुंदून स्फुंदून रडत होती, आणि जेव्हां त्याला तेथें आणिलें, तेव्हां त्याच्या मनांत त्या दिवसच्या चोरीपासून तों यावेळेपर्यंत सर्व उभें राहिलें आणि त्यानें शिपायांना सांगितलें कीं वावानो मी तर आज मरतोंच आहें पण मला एकदां आईची शेवटची भेट घेऊं द्या, तेव्हां शिपायांना दया येऊन त्यांनीं त्यास आईशीं वोलावयास परवानगी दिली. तेव्हां त्यानें आईशीं वोलवयास जाऊन तिच्या कानाचा चावा घेतला, तेव्हां त्यास लोक ह्मणाले कीं, ह्यास देण्याजोगी अशी उपमाच नाहीं. आजपर्यंत हा चोऱ्या करीत आलाच परंतु ज्या दिवशीं मरावयाचा त्या दिवशीं देखील पाप करावयास चुकला नाहीं. तेव्हां तो त्यांस ह्मणाला, "मी जर हिचा आज प्राण घेतला असता तरी मला दोष लागता ना. तेव्हां त्यांना वाटलें कीं आईच लुच्ची आहे. असो. आपल्या मुलांच्या आंगीं मोठेपणीं चांगले गुण असावेत, त्यांस पुष्कळ पैसा मिळावा, जिकडे तिकडे त्यांची कीर्ति व्हावी, चारचौघांत त्यांना मान मिळावा असें जर त्यांच्या आईबापांस वाटत असेल तर त्यांनीं आपल्या मुलांस खरेपणा, प्रामाणिकपणा, सचोटी, व नीति हे गुण शिकविले पाहिजेत. इतकें वोलून मी सर्व सभासदांची रजा घेतों.

## परिशिष्टनंबर ५.

मुंबईतील महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळीच्या सन १८८६ सालच्या भाषणसमारंभांतील अखेरच्या दिवशीं ह्मणजे तारीख १७ डिसेंबर सन १८८६ रोजीं उमेद्वारांचीं सर्व भाषणें पुरीं झालीं. नंतर प्रत्येक विषयाच्या परीक्षक कमिटींतील प्रमुख गृहस्थांनीं आपआपल्या विषयाच्या संबंधानें दिसून आलेल्या न्यूनाधिक्यावद्दल सूचनापर अशीं भाषणें केलीं. नंतर शेवटीं आ० काशिनाथ त्रिंबक तेलंग सी. आय. ई. हे येऊन अध्यक्षस्थानीं वसले. आणि सभेनें पूर्वीं प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीप्रमाणें पसंत ठरलेल्या वक्त्यांस वक्षिसें दिलीं. नंतर सभेचे चिटणीस रा. रा. काशीनाथ त्रिंबक खरे यांणीं त्या प्रसंगीं सर्वांस जाहिर करण्याजोग्या हकीकतीचा पुढें दिलेला कागद वाचून दाखविला.

१ हा भाषणसमारंभ तारीख १२ रविवारीं सुरू होऊन आज ६ दिवस चालत होता. त्याची आज समाप्ति होणार आहे हें आपण सर्व जाणतच आहां.

२ ह्या कृत्याच्या साह्यार्थ श्रीमन्महाराज वाळासाहेव होळकर सरकार इंदुर यांणीं कृपा करून ५०० शें रुपये सभेकडे पाठवून दिले. हें ऐकून आपणा सर्वांस अत्यानंद होईल. होळकर सरकाराकडून मिळालेल्या उदार वुद्धीच्या देणगीनें ह्या विद्याविषयक कामास बरीच बळकटी येणार आहे. ह्मणून ही सभा श्रीमंत होळकर सरकारचे वहुत उपकार मानीत आहे.

३ त्याचप्रमाणें इतर गृहस्थांकडून बक्षिसाकरितां सभेस साह्य मिळालें त्याचा तपशील.

१ रा. रा. नरहर गोपाळ सरडे कोल्हापूरकर नाटकाचे मालक यांणीं दुसऱ्या विषयावरील पहिल्या बक्षिसाकरितां २५ रुपये दिले.

२ एका सद्गृहस्थांनीं दुसऱ्या विषयावरील तिसऱ्या उमेद्वारास बक्षीस देण्याकरितां १० रुपये आतांच दिले. आपलें नांव प्रसिद्ध करण्याची त्या गृहस्थांची इच्छा नाहीं.

३ तिसऱ्या विषयावरील ३ ऱ्या बक्षिसाकरितां रा. रा. वासुदेव मोरेश्वर पोतदार यांणीं ४ रुपये दिले.

४ तिसऱ्या विषयावर बोलणाऱ्या उमेद्वारांस बक्षिसें देण्याकरितां रा. रा. गोविंद रामकृष्ण फणसळकर यांणीं कांहीं पुस्तकें सभेकडे पाठविलीं.

ह्या सर्व गृहस्थांचे सभा बहुत आभार मानते.

४ ह्या भाषणसमारंभ सुरू करण्याची प्रथम वाटाघाट होऊं लागली त्यावेळीं सभेजवळ मुळींच फंड नव्हता. यामुळें सभेच्या खर्चास पुरण्याजोगें द्रव्याचें साहाय्य कसें मिळेल ह्याबद्दल फार शंका वाटत होती. ह्मणूनच सभेच्या कामास आरंभ करण्याचा तिच्या उत्पादकांस धीर होईना. तेव्हां त्यांस एका देशहितचिंतक उदार गृहस्थांनीं असें वचन दिलें कीं, 'तुह्मी धैर्यानें पुढें सरून प्रयत्न करा. आणि इतकेंही करून कांहीं तूटच आली तर ती पुरी होण्याजोगें मी द्रव्याचें साह्य करीन' असें त्या थोर गृहस्थांनीं अश्वासन दिल्यावरून त्या आधाराच्या दमावर कित्येक मंडळींनीं फार परिश्रम करून मोठा प्रयत्न केला. त्यामुळें सभेच्या खर्चास पुरण्याजोगें बहुजनसमुदायाकडून द्रव्याचें साह्य मिळालें. ह्मणून हें काम उभारून इतक्या स्थितीस येऊन पोंचलें. त्याबद्दल त्या त्या गृहस्थांचे सभा बहुत आभार मानिते.

५ ह्या समारंभाचे साह्यार्थ बऱ्याच लोकांनीं यथाशक्ति चांगलें साह्य दिलें. त्यामुळें सभेचें एकंदर उत्पन्न अजमासें पांचशें रुपये होईल असा अजमास आहे. सभेच्या हकीकतीचा रिपोर्ट व जमाखर्चाचा हिशेब लवकरच प्रसिद्ध होणार आहे. त्यावरून सर्व कळून येईल. याप्रमाणें रा. रा. खरे यांणीं कागद वाचून दाखविल्यावर, आ० तेलंग यांणीं उभें राहून पुढील भाषण केलें.—

अशा समारंभाच्या समाप्तीस अध्यक्षानें च्यार शब्द बोलावे अशी वहिवाट आहे, परंतु उशीर फार झाला आहे. सबब असे प्रसंग पुन: येतील त्या वेळेस कायकाय केलें पाहिजे, या संबंधानें ज्या सूचना झाल्या आहेत त्यांविषयीं मात्र थोडेसें बोलून आजचा समारंभ पुरा करावा हें मला बरें वाटतें. पहिली सूचना अशी आहे कीं—

'विद्यार्थ्यांच्या स्थितींत असणाऱ्या मुलांनीं असल्या सभेंत बोलण्यास येण्याचें इच्छिल्यास त्यांच्या विद्याभ्यासास व्यत्यय येण्याची भीति आहे. याकरितां विद्यार्थ्यांनीं असला प्रयत्न करणें हें इष्ट होणार नाहीं.' असें रा. रा. दाजी आबाजी खरे यांणीं सुचविलें. त्यासंबंधानें रा. रा. गोविंद शंकर शास्त्री बापट यांणीं असा आक्षेप दर्शविला कीं, 'असा नियम बांधतां येणें व तो अमलांत आणणें ह्या दोन्ही गोष्टी अशक्य दिसतात.' तथापि



त्याबद्दल पुढल्या प्रसंगीं सभेनें विचार करावा हें बरें दिसतें. यंदाच्या भाषणांपैकीं जीं भाषणें मी ऐकिलीं त्यांत कांहीं प्रसंगीं लहानतोंडीं मोठा घांस असा प्रकार माझ्या दृष्टीस पडला, व तो सर्वथा अनिष्ट आहे यांत कांहीं शंका नाहीं. वक्तृत्वोत्तेजन ह्मणजे खऱ्या वक्तृत्वाचें उत्तेजन झालें पाहिजे.

बोलणाऱ्या वक्त्यांच्या तोंडांतून नदीच्या प्रवाहाप्रमाणें एकसारिखा शब्दांचा ओघ चालावा अशी कित्येक श्रोत्यांची दुष्ट अपेक्षा दिसते. यामुळें त्यांस संतुष्ट करण्यासाठीं कित्येक वक्ते तसा प्रयत्न करूं पाहातील तर त्याचा परिणाम अनिष्ट होईल, हें उभयतांनींही ध्यानांत ठेविलें पाहिजे. कारण अशा बोलण्याला वक्तृत्व ह्मणतां येत नाहीं. भाषण जरा सावकाश झालें तरी चिंता नाहीं, पण प्रतिपादनाचा विषय श्रोत्यांच्या मनांत नीटपणें संगतवार भरेल अशा प्रकारें त्याचें विवेचन झालें पाहिजे. ह्मणून हें तत्त्व साधण्याविषयीं श्रोत्यांनीं व वक्त्यांनीं फार जपलें पाहिजे.

एकाच विषयावर बोलणारे अनेक उमेद्वार सन्निध बसून त्या विषयावरील होणारीं भाषणें ऐकत असल्यास एखाद्याचें भाषण श्रोत्यांस न रुचल्यास ते बोलणाऱ्याची टर उडवितात हें पाहून इतर उमेद्वारांचें धैर्य खचण्याचा संभव आहे. अथवा एकाचे भाषणांतल्या कांहीं चांगल्या कोट्या मागून बोलणाऱ्या उमेद्वारानें ऐकून घेऊन आपल्या भाषणास जोडल्या तर पहिल्या बोलणाऱ्याचें एका प्रकारचें नुकसान होण्याचा संभव आहे. ह्मणून एका विषयावरील उमेद्वारांस त्यांचें भाषण होईपर्यंत पूर्वींचीं भाषणें ऐकू न येतील इतकें दूर बसवावें असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पूर्वी एथें अशीच वहिवाट होती. तथापि पुण्यास कांहीं वर्षें अशी वहिवाट चालून तसें करणें निरर्थक आहे असें वाटल्यावरून हा प्रतिबंध काढून टाकला. त्याच धोरणानें यंदां येथें व्यवस्था करण्यांत आली, त्याबद्दल कोणत्याही वक्त्यानें हरकत दाखविली नाहीं. तथापि सभेनें याबद्दल विचार करून पुढील प्रसंगीं योग्य दिसेल तशी व्यवस्था करावी.

ह्या समारंभाच्या आरंभापासून आज ६ दिवस दररोज अजमासें ६।७ शें सुशिक्षित व विद्याभिलाषी लोकांनीं एथें वेळेवर येण्याचे श्रम घेतले. आणि स्वस्थ चित्तानें उमेद्वारांचीं भाषणें ऐकून घेऊन त्यांस उत्तेजन दिलें. ह्मणून हा भाषणसमारंभ चांगल्या प्रकारें सिद्धीस जाऊन सर्वांस आनंददायक झाला. याचप्रमाणें ह्या कृत्यास प्रतिवर्षी सर्वांनीं थोडथोडी यथाशक्ति मदत केल्यास ह्या समारंभापासून मोठा लाभ होईल, आणि आपल्यामध्यें चांगल्या वक्त्यांची जी फार उणीव आहे ती हळुहळू दूर होईल अशी आशा आहे.

या समारंभाचा जो मुख्य हेतु आहे तो सिद्धीस नेण्याला यांना कांहीं निराळें रूप दिलें असतां मदत जास्त होईल, असें कांहीं लोकांचें मत आहे, व मलाही तसेंच वाटतें. त्याबद्दल व्यवस्थापक मंडळीकडे मी सूचना करणार आहें. त्याचप्रमाणें इतर गृहस्थही आपल्या अभिप्रायाप्रमाणें सूचना करतील तर त्या सर्वांचा विचार करून सुधारणा करण्यास ठीक पडेल. अशा समारंभापासून होणारे फायदे वृद्धिंगत व्हावे, आणि जें कांहीं थोडें नुकसान

एखाद्या प्रसंगीं होत असेल तें टाळावें याकरितां सर्व लोकांनीं विचार करून सूचना केल्य तर या मंडळीवर व परंपरया आपल्या सर्व देशबंधूंवर त्यांचे उपकार होतील.

शेवटीं ह्या कृत्यास ज्यांणीं ज्यांणीं मदत केली आहे त्या सर्वांचे सभेच्या तर्फेनें फार फार उपकार मानून हा भाषणसमारंभ समाप्त करतों.